रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३३६
www.ramprahar.com
सोमवार, २३ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## मध्यपूर्वेत संघर्ष : पंतप्रधान मोदींचा इराणच्या राष्ट्राध्यक्षांना फोन



**नवी दिल्ली :** अमेरिकेने इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर केलेल्या हल्ल्यामुळे जगात घबराट पसरली आहे. हा हल्ला करून अमेरिकेने इराण आणि इस्रायलमध्ये सुरू असलेल्या या युद्धात उडी घेतली. मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २२) इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी फोनवरून संवाद साधला. याबाबत एक्सवरील पोस्टमध्ये माहिती देताना पंतप्रधान मोदींनी म्हटले की, मी इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी बोललो. आम्ही सध्याच्या परिस्थितीवर सविस्तर चर्चा केली. अलिकडच्या काळात वाढलेल्या तणावाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. संवाद आणि राजनैतिक कूटनीतिला प्राधान्य देऊन तणाव कमी करण्याचे आवाहन मी केले आणि या प्रदेशात शांतता, सुरक्षा आणि स्थिरता लवकरात लवकर प्रस्थापित करण्याच्या गरजेवर भर दिला आहे.

अंतरंग
माथेरान घाटात अपघात; सुदैवाने पर्यटक बचावले/२
खोपोली स्टेशनमध्ये समस्या; उपाययोजनांची मागणी/५
टी-२० वर्ल्डकपसाठी कॅनडा संघ पात्र/८

# भाजप सर्वत्र मजबूत होतोय!

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

### वडगाव सरपंच गौरी गडगे, महादेव गडगे, बाळाराम शिर्के आणि समर्थकांच्या हाती 'कमळ'

**चौक : प्रतिनिधी**

भारताचे यशस्वीपणे नेतृत्व करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून देशभर भारतीय जनता पक्ष मजबूत होत असताना, आमदार महेश बालदी यांच्या कार्यावर विश्वास बसल्याने या परिसरातील नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांचा विश्वास निश्चितपणे सार्थ ठरेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. २२) व्यक्त केला.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

उरण विधानसभा मतदारसंघातील वडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच गौरी महादेव गडगे, उपसरपंच महादेव कमळाकर गडगे आणि शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाळाराम शिर्के यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व शेकापमधील अनेक कार्यकर्त्यांनी नढाळ (ता. खालापूर) येथील पंचयतन मंदिरात आयोजित कार्यक्रमात भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

या कार्यक्रमास उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, रामदास ठोंबरे, खालापूर पश्चिम मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोतीराम ठोंबरे, पनवेल दक्षिण मंडळ मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, प्रवीण खंडागळे, चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, माजी सरपंच विजय मुरकुटे, गणेश कदम, प्रकाश घोगरे, गणेश मुकादम, काशिनाथ गावडे, सागर ओसवाल, अविनाश गाताडे, कृष्णाशेठ पारंगे, ज्येष्ठ नेते विनोद भोईर, जगदीश हातमोडे, सुनील गायकवाड, सरपंच रवी कुंभार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपची विकासात्मक कार्यशैली पाहून विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये दिवसेंदिवस दाखल होत आहेत. अशाच प्रकारे या कार्यक्रमात वडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच गौरी महादेव गडगे, उपसरपंच महादेव कमळाकर गडगे, शाखाप्रमुख दशरथ देहू पाटील, माजी सरपंच अनंता बाळाराम पाटील, शेकाप नेते बाळाराम बंडू शिर्के, राजेश बाळाराम पाटील, वसंत गोविंद पाटील, शिवाजी शिंदे, वर्षा पाटील, युवा सेना विभाग प्रमुख वैभव मुंढे, मंगेश दसवते, जगन कातकरी, राजेश साळुंखे, प्रल्हाद पाटील, अनिल पवार, संदीप शिंदे, दीपक वर्षी, अनिकेत पारंगे, संदेश भोईर, वडगाव वाडी येथील भगवान वाघमारे, मनोहर वाघमारे, परशुराम वाघमारे, संजय वाघमारे, शिवराम वाघमारे, तळवली वाडी येथील अनिल पवार, अर्जुन पवार, भगवान पवार, संतोष पवार, भीम पवार, अनिल पवार, पांडुरंग वाघमारे, नितीन पवार, शिवनगर वाडी येथील भिवा वाघमारे, रामदास वाघमारे, वामन वाघमारे, अविनाश वाघमारे, वडगाव येथील वासुदेव जाधव, विक्रम जाधव, जगदीश जाधव, जीवन जाधव, कालिदास, महेश ठोंबरे, समीर ठोंबरे, सुरेश जाधव, अनंता गडगे, योगेश ठोंबरे, विलास जांभुळकर, किशोर जांभुळकर आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी पक्षात स्वागत केले.

### विकासकामांसाठी निधी कमी पडणार नाही –आमदार महेश बालदी

या वेळी आपल्या भाषणात उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार महेश बालदी म्हणाले की, सुधीर ठोंबरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर पाठोपाठ अनेकजण दाखल झाले. अशाच प्रकारे गौरी आणि महादेव गडगे यांनी आता प्रवेश केला असून तुम्हाला विकास करण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही. माझ्या मतदारसंघातील प्रत्येक आदिवासी बांधव हा पक्क्या स्वरूपाच्या घरात राहण्यास जाईल, प्रत्येक वाडी वस्तीत रस्ता होईल आणि ते सांगणारा आमदार महेश बालदी असून कुणाचाही विश्वासघात होणार नाही याची काळजी मी स्वतः घेईन.

# वारीसंदर्भात अबू आझमी यांचे वादग्रस्त वक्तव्य

**मुंबई : प्रतिनिधी**

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वारीसंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केले आहे. वारीमुळे रस्ता जाम होतोय, पण आम्ही कधी तक्रार केली नाही, असे आझमी यांनी म्हटले आहे. त्यामुळे वादंग निर्माण होण्याची शक्यता आहे.

आझमी म्हणाले की, वारीमुळे रस्ता जाम होतो. हिंदूंचे सण साजरे केले जातात तेव्हा मुस्लीम व्यक्ती तक्रार करत नाही, मात्र मुस्लीमांच्या नमाजाच्या वेळी तक्रार करतात. दरम्यान, आझमी यांच्या या वक्तव्यावर



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

'अबू आझमी यांना वादग्रस्त विधाने करण्याचा शौक आहे. वादग्रस्त विधान केले की प्रसिद्धी मिळते असे त्यांना वाटते. त्यामुळे अबू आझमी यांना प्रसिद्धीच्या लायक समजत नाही. म्हणून त्यांच्या फालतू वक्तव्याला उत्तर देणार नाही,' असा टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना लगावला.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांची पालखी सध्या पुण्याच्या दिशेने पंढरपूरकडे मार्गक्रमण करीत आहे. अशातच समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी आषाढी वारीबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे. आझमी यांच्या या वक्तव्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

## संसद आणि राज्यांच्या अंदाज समित्यांची आजपासून विधानभवनात राष्ट्रीय परिषद

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषद मुंबईत विधानभवन येथे २३ व २४ जून रोजी आयोजित करण्यात आली आहे.

परिषदेला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, लोकसभेच्या अंदाज समितीचे समिती प्रमुख डॉ. संजय जयस्वाल, महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीचे समिती प्रमुख अर्जुन खोतकर यांच्यासह दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य आणि महाराष्ट्रातील संसद सदस्य उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेत प्रशासनीक कार्ये सक्षमपणे व अल्पव्ययासह होतील याच्या सुनिश्चिततेसाठी अर्थसंकल्पीय अंदाजांचे पुनर्विलोकन व प्रभावी नियंत्रण याकरिता अंदाज समितीची भूमिका या विषयावर विचारमंथन होईल.

## एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका आज होणार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत मिळण्यासाठी व इतर आर्थिक कामकाजासंदर्भातील महामंडळाची श्वेतपत्रिका सोमवारी (दि. २३) जाहीर होणार आहे.

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी तसेच भविष्यातील नियोजनासाठी एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी, असे आदेश परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एप्रिलमध्ये एसटी प्रशासनाला दिले होते. त्यानंतर दोन महिन्यांनी ही श्वेतपत्रिका जाहीर केली जाणार आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेला आजपासून सुरुवात

### १८ शाळांतील १४ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्वकौशल्य आणि नेतृत्वगुणांची जोपासना व्हावी या हेतूने पनवेल महानगरपालिका आणि कोशिश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा २३ जून ते ३१ जुलैपर्यंत भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे.




कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा दरवर्षी यशस्वीपणे राबवली जाते. या वर्षी स्पर्धेचे तिसरे वर्ष असून १८ शाळांमधून सुमारे १४ हजार विद्यार्थी सहभाग घेणार आहेत. स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

स्पर्धा वर्ग अंतर्गत फेरी, शाळा अंतर्गत फेरी आणि शालेय अंतिम फेरी होणार असून निवडक ६०० स्पर्धकांमधून अंतिम ६० विजेते ठरणार आहेत. त्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे.

> **वक्तृत्व स्पर्धा ही आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण वाढवण्यासाठी प्रभावी साधन आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतःला प्रभावीपणे व्यक्त करता यावे हीच आमची भावना आहे.**
>
> **–परेश ठाकूर,**
> अध्यक्ष, कोशिश फाउंडेशन

स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल कामोठे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे, चांगू काना ठाकूर विद्यालय (इंग्रजी माध्यम) नवीन पनवेल, चांगू काना ठाकूर विद्यालय (मराठी माध्यम) नवीन पनवेल, सुषमा पाटील विद्यालय कामोठे, लोकनेते डी.बा. पाटील विद्यालय कामोठे, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे तसेच पनवेल महानगरपालिकेच्या ११ प्राथमिक शाळांचा सहभाग असणार आहे. (पान २ वर..)

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रेयसीच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिच्या गुप्तांगात स्क्रूड्रायव्हर टाकण्याचा धक्कादायक प्रकार मुंबईच्या जोगेश्वरी पूर्व भागात घडला आहे. नराधमाने अत्याचार करत व्हिडीओदेखील शूट केला होता. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी आणि त्याच्या प्रेयसीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

तुझ्या आईला जीवे मारून टाकीन, अशी धमकी देत नराधमाने १० वर्षीय मुलीवर वारंवार अत्याचार केला. अखेर त्रास असह्य झाल्यामुळे तिने आपल्या आईला आपबिती सांगितली. हा प्रकार मुलीच्या आईला कळल्यानंतर आरोपीने तिच्यावरही टोकदार वस्तूने हल्ला केला. पोलिसांनी २४ वर्षीय आरोपीला अटक केली आहे.






# राज्यातील प्रमुख रस्ते, पुलांचे दुरुस्ती-देखभाल काम वेगाने!

## ◆ पावसाळ्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग सज्ज

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळ्यात रस्ते व पूल सुस्थितीत राहावेत, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने व्यापक उपाययोजना राबविल्या असून, राज्यातील प्रमुख रस्त्यांचे व पुलांचे दुरुस्ती व देखभाल काम वेगाने सुरू आहे.

राज्यातील प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग तसेच प्रमुख जिल्हा मार्ग यांची दैनंदिन देखभाल व वेळोवेळी दुरुस्ती करून हे रस्ते वाहतुकीसाठी योग्य राहावेत, यासाठी विभाग सतर्क आहे. अतिवृष्टीमुळे पाण्याखाली जाणाऱ्या पुलांवर खबरदारीचा उपाय म्हणून सावधानतेचे फलक लावण्यात येत असून, दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी वाहतुकीसाठीचे पर्यायी मार्ग योग्य स्थितीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पावसाळ्यात विशेष खबरदारी घेण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली सध्या एकूण १६,५१९ लहान-मोठे व ब्रिटीशकालीन पूल आहेत. यापैकी ४५१ पुलांचे संरचनात्मक परीक्षण करण्यात आले आहे. मागील १० वर्षांत १,६९३ पुलांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

### नियंत्रण कक्ष कार्यरत

***राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुका स्तरापर्यंत नियंत्रण कक्ष कार्यरत असून, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता हे या कक्षांचे वेळोवेळी निरीक्षण करत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या तयारीमुळे पावसाळ्यातील आपत्कालीन स्थितींना सक्षमपणे तोंड देणे शक्य होणार आहे, असा विश्वास व्यक्त*** केला जात आहे.

धोकादायक स्थितीत असलेल्या किंवा वाहतुकीसाठी बंद असलेल्या पुलांच्या दोन्ही बाजूंना सावधानतेचे फलक व बॅरिकेट्स लावण्यात आले आहेत. अशा रस्ते व पुलांची स्थिती शासन स्तरावरून सातत्याने तपासली जात आहे.

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणींवर वेळीच उपाय करता यावा, यासाठी एक प्रमाणित कार्यपद्धती तयार करण्यात आली असून, त्याअंतर्गत अभियांत्रिकी सहायक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांना विशिष्ट जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

# रेवस योजनेची जलवाहिनी फुटली

### पाणीपुरवठा खंडित

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांना ऐन पावसाळ्यात पाणी टंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. मुनवली येथे रेवस पाणीपुरवठा योजनेच्या पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी पाच दिवसांपूर्वी फुटली.

जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम कासव गतीने सुरू असल्याने तब्बल ३२ गावांचा पाणीपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांना पावसाळ्यात देखील पाण्यासाठी वणवण करावी लागते आहे. याबाबत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

किहीम ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांना सरपंच पिंट्या गायकवाड टँकरने पाणीपुरवठा करीत असल्याने किहीम हद्दीतील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे, मात्र किहीम विभाग वगळता अन्य गावातील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. ऐन पावसाळ्यात विकतचे पाणी घेऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

सरपंच पिंट्या गायकवाड यांनी मुनवली येथे प्रत्यक्ष जलवाहिनी फुटलेल्या ठिकाणी भेट देऊन जलवाहिनी दुरुस्त करणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून पाणीपुरवठा सुरळीत चालू करावा, अशी मागणी केली आहे.



**मुनवली येथे दोन ठिकाणी सोमवारी जलवाहिनी फुटली होती, मात्र या जलवाहिनीच्या दुरुस्तीकरीता लागणारे ज्वाइंट (क्लॅम्प) पाईप उपलब्ध नव्हते. त्याची ऑर्डर संबंधित कंपनीला दिली होती, पण यायला वेळ लागला. आता ज्वाइंट मिळाला आहे. काम पूर्ण करून लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल.**

**-संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा**

# पर्यटकांच्या गाडीचा माथेरान घाटात अपघात

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकाच्या अर्टिका कारला भीषण अपघात घडला. दरम्यान, या अपघातात कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी दैवबलवत्तर म्हणून यातील सात प्रवाशी थोडक्यात बचावले आहेत. घाटातील पीटकर पॉईंट येथील अवघड वळणार चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्त्याची सुरक्षा रेलिंग तोडून खोल दरीच्या बाजूस म्हणजेच रस्ता आणि खोल दरीच्या मध्ये हेलकावे खात अडकून राहिले व सुखरूप बचावले.

रविवारी पर्यटक माथेरान फिरण्यासाठी म्हणून वळले होते. वेगवेगळ्या परिसरातून, जिल्ह्यातून, तालुक्यातील आलेल्या पर्यटकांनी माथेरान येथे आपल्या खाजगी वाहनाने येणे पसंत केल्याचे चित्र होते. ठाणे जिल्ह्यातील बालकुम येथील राहणारा वाहन चालक सुरज येसले हादेखील परिसरातील सहा पर्यटकांना आपल्या वाहन अर्टिका कारमध्ये बसून भाडे म्हणून घेऊन आला होता. सकाळी सुरज हा माथेरान घाट चढण्यासाठी म्हणून नेरळ येथून सुरुवात केली होती. साडे दहा वाजण्याच्या सुमारास वॉटर पाईप या रेल्वे स्थानकाच्या जवळील असलेल्या पिटकर या अवघड वळणावर घाट चढत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. एकीकडे घाटात वाहनांची तर दुसरीकडे पर्यटकांची गर्दी होती. रविवार सुट्टी असल्याने ही गर्दी दिसून येत होती. दरम्यान सूरजला घाटात समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज न आल्याने त्याने आपल्या कारची स्टेरिंग गोल फिरवली असता कार वरील नियंत्रण सुटले.

कार रस्त्याच्या कडेला असणाऱ्या लोखंडी सुरक्षा रेलिंग तोडून खोल दरीच्या बाजूस अर्धवट अडकून पडली. दैवबळवत्तर म्हणून कार खोल दरीच्या बाजूला न पडता कार रस्ता आणि खोल दरीच्या मध्येच अर्धवट अवस्थेत हवेत हेलकावे खात अडकली. अपघात लक्षात घेता स्थानिक प्रवाशी वाहन चालकांनी अपघातग्रस्त वाहनातील पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढले. या वेळी आपण थोडक्यात बचावलो म्हणून पर्यटकांनी मोकळा श्वास घेतला.अन्यथा ही कार खोल दरीत कोसळली असती तर मोठी दुर्घटना घडली असती.



# प्रजापती संस्थेतर्फे विद्यार्थ्यांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ रजि. राष्ट्रीय सामाजिक संघटना एनजीओच्या वतीने हायस्कूल आणि इंटरमिजिएटच्या हुशार विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत प्रमाणपत्रे आणि स्मृतिचिन्हे (ट्रॉफी) देऊन सन्मानित करण्यात आले.

संस्थेने सुमारे १५० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, नोटबुक, पेन, पेन्सिल, पाण्याच्या बाटल्या आणि फाईल्स इत्यादींचे वाटप केले.

या वेळी मान्यवरांनी सांगितले की, गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करणे आणि शैक्षणिक साहित्य देणे हे त्यांचे प्रोत्साहन, उत्साह आणि मनोबल वाढवण्यासाठी केले जाते. ते म्हणाले की विद्यार्थ्यांनीही कठोर अभ्यास करावा आणि त्यांच्या पालकांचे आणि समाजाचे



नाव उंचावे. मान्यवरांनीही संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस गजेंद्र प्रजापती, वरिष्ठ शास्त्रज्ञ बीएआरसी के. के. वर्मा, प्रद्युम्न प्रजापती, डॉ. भगवान दास प्रजापती, सर्वजीत प्रजापती, इंदर प्रजापती, बंधू प्रजापती, जितेंद्र प्रजापती, महेश प्रजापती, राजेंद्र प्रजापती, संजय कुंभार, रोहित प्रजापती, अनूप प्रजापती, मोहन प्रजापती, राम प्रजापती, जी.पी.कुमार प्रजापती, डॉ. प्रजापती, सागर प्रजापती, लवकुमार प्रजापती, लोकनाथ प्रजापती, अशोक प्रजापती, कचरुजी खोवल प्रजापती, भगवानदास प्रजापती, तुफानी प्रजापती, बळवंत प्रजापती, राकेश प्रजापती आदींनी विशेष सहकार्य केले.

# दंड तपासणी व भरण्याची सुविधा

## खारघर वाहतूक पोलीस शाखेचा अनोखा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाहनचालकाने नियमाचे उल्लंघन केल्यानंतर त्यांना ऑनलाईन दंड आकारला जातो. तो आकारलेला दंड भरायचा कुठे माहिती नसल्यामुळे वाहनचालकांचा वेळ वाया जात होता. ही बाब लक्षात घेऊन खारघर उड्डाणपुलाखालील मंकी पॉईंट येथील वाहतूक चौकी येथे वाहनचालकांसाठी दंड तपासणी व भरण्याची सुविधा खारघर वाहतूक पोलीस शाखेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या ठिकाणी वाहन चालक आपल्याविरोधातील प्रलंबित दंड तपासू शकतात तसेच तिथेच दंडाची रक्कम भरू शकतात. वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



या उपक्रमामुळे वाहनचालकांना पोलीस ठाणे किंवा इतर कार्यालयात जावे न लागता थेट चौकीवरच आवश्यक ती कारवाई पूर्ण करता येणार आहे. यामुळे वेळेची बचत होणार असून वाहतूक व्यवस्थेत पारदर्शकता आणि शिस्त वाढण्यास मदत होईल. या राबवत असलेल्या मोहिमेचे वाहनचालकांनी खारघर वाहतूक शाखेचे कौतुक केले आहे.

# अपघातामधील जखमी वृद्ध दाम्पत्याचा उपचारादरम्यान मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ-कळंब या राज्य मार्गावर सकाळच्या सुमारास डंपरला ओव्हरटेक करण्याच्या नादात कार आणि स्कुटीच्या झालेल्या भीषण अपघातात वृद्ध दाम्पत्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



विनोद पिल्लई (वय ६२) आणि सुषमा पिल्लई (वय ५६) हे दांपत्य नेरळच्या दिशेने स्कुटीवरून येत होते. त्याचवेळी नेरळहून कळंबच्या दिशेने भरधाव निघालेला कार चालक संस्कार अंजने हा ओव्हरटेक करीत असताना समोरून येणाऱ्या वृद्ध दांपत्याच्या स्कुटीला विरुद्ध दिशेने धडक दिल्याने या झालेल्या अपघातात वृद्ध दांपत्य हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना स्थानिकांनी नेरळ येथे खासगी रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा दुपारी उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाची मालवाहतुकीत उल्लेखनीय कामगिरी

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विभागाने एप्रिल ते मे २०२५ या कालावधीत एकूण ३.४३ दशलक्ष टन मालाची लोडींग केली असून, मे २०२५ मध्ये १.७७ दशलक्ष टन मालाची लोडींग झाली आहे.

मध्य रेल्वेच्या कंटेनर लोडिंग क्षेत्रात विशेष वाढ झाली आहे. एप्रिल ते मे २०२५ या कालावधीत एकूण १.६५ दशलक्ष टन कंटेनरची लोडींग झाली, जी मागील वर्षी (२०२४-२५) याच कालावधीतील १.३३ दशलक्ष टनपेक्षा अधिक आहे. मे २०२५ मध्ये ०.७७ दशलक्ष टन मालाची लोडींग झाली, जी मे २०२४ मधील ०.६९ दशलक्ष टनपेक्षा जास्त आहे.

मे २०२५ मध्ये एकूण ६५० कंटेनर भरले गेले, तर मे २०२४ मध्ये ५९५ कंटेनर भरले गेले होते. इतर महत्त्वाच्या मालवाहतुकीमध्ये (एप्रिल ते मे २०२५) लोखंड व पोलाद ०.६८ दशलक्ष टन, कोळसा ०.४८ दशलक्ष टन, खते ०.३९ दशलक्ष टन, इतर वस्तू ०.२५ दशलक्ष टन एवढं आहे.

फक्त मे २०२५ महिन्यातील चढाईचा तपशील पाहता कोळसा ०.३४ दशलक्ष टन (मे २०२४ मध्ये ०.३१ दशलक्ष टन), लोखंड व पोलाद ०.३१ दशलक्ष टन, खते ०.२१ दशलक्ष टन, इतर वस्तू ०.१४ दशलक्ष टन एवढा आहे

मुंबई विभागाने पेण येथून माणगाव येथील पोस्को स्टील कारखान्यापर्यंत रस्त्याने होणारी एचआर कोईल्स (गरम रोल केलेली लोखंडी पट्टे) ची वाहतूक रेल्वेमार्गावर वळवण्यात यश मिळवले आहे.

१४ मे २०२५ रोजी कळंबोली मालधक्क्यावरून पहिली मालगाडी भरली गेली. हे मालधक्के ३० जानेवारी २०२५ रोजी कंटेनर मालगाड्यांचे टर्मिनल म्हणून अधिसूचित करण्यात आले होते. येथून दरमहा सरासरी ७ मालगाड्या भरल्या जातील अशी अपेक्षा आहे. मुंबई विभागाने मालवाहतूक वाढवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. यामुळे माल चढाईच्या कामगिरीत सातत्यपूर्ण प्रगती होत असून, महत्त्वपूर्ण वाढ साधण्यात विभागाला यश आले आहे.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात योग दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय मराठी माध्यमात शनिवारी मुख्याध्यापक दीपक भरणुके यांच्या अध्यक्षतेखाली योग दिन साजरा झाला.

या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून मुरलीधर गुरव व सौभाग्यवती अनुपमा गुरव या दोन तज्ञ मार्गदर्शकांचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन लाभले कार्यक्रमाच्या सुरुवातीला थोडक्यात प्रास्ताविक सौ पाटील मॅडम यांनी केले. मुख्याध्यापकांनी गुरव दांपत्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. अनुपमा गुरव यांनी योगाचे महत्त्व बदललेली जीवनशैली आणि भविष्यातील आरोग्याबद्दलचे धोके याविषयी मार्गदर्शन केले व त्यानंतर योग आणि ध्यान याचे प्रात्यक्षिक करून दाखवले शेवटी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख सौभाग्यवती भारती म्हात्रे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमासाठी पाटील सर व वेदांगी म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले विद्यार्थ्यांनी कार्यक्रमानंतर आपल्या समस्या पाहुणे मार्गदर्शक गुरव मॅडम यांना विचारल्या हा कार्यक्रम अतिशय सुंदर पद्धतीने झाला.



पान १ वरून

# आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेला आजपासून सुरुवात

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या यापूर्वीच्या वर्षात १४ हजारहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग झाला होता. त्यात आठ हजारहून अधिक विद्यार्थ्यांना भेटवस्तू, १५०० विद्यार्थ्यांना पदके, तर ४०० विद्यार्थ्यांना ट्रॉफी देण्यात आल्या होत्या.

यंदाही तितक्याच उत्साहात स्पर्धा पार पडेल, असा विश्वास स्पर्धा प्रमुख व भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी व्यक्त केला आहे.

स्पर्धेत १८ शाळांमधून सुमारे १४ हजार विद्यार्थी सहभाग घेणार आहेत. त्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे.

# पोलिसांच्या तत्परतेमुळे सोन्याच्या दागिन्यांची पिशवी मिळाली परत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे एका महिले कडील सोन्याच्या दागिन्यांची पिशवी हरवली होती ती तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे परत मिळून सदर महिलेला ती परत करण्यात आली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मेघा नरेश पाटील, (राहणार भाताण) यांनी पोलीस ठाणे येथे येऊन सांगितले की त्यांचे सोन्याचे दागिने हे भाताण ते जवेरी बाजार अशा प्रवासादरम्यान कुठेतरी पडून गहाळ झाले आहेत. हे सोन्याचे दागिने पनवेल येथे गहाण ठेवून त्या बदल्यात पैसे घेऊन मुलाच्या शाळेची फी भरायची होती, परंतु त्यापूर्वीच दागिने हे कोठेतरी पडून गहाळ झाले आहेत. हे दागिने सापडले नाही तर मुलाची शाळेची फी भरता येणार नाही असे बोलून जोरजोराने रडू लागल्या. महिलेच्या तक्रारीची त्वरित दखल घेत त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची तक्रार नोंदवून पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला.

तपासादरम्यान जवळपास ३५ ते ४० सीसीटीव्ही कॅमेरे चेक करून त्यांचे गहाळ झालेले सोन्याचे दागिने हे एक अनोळखी व्यक्तीस सापडले आहे असे सीसीटीव्ही फुटेज तपासताना निदर्शनास आले. त्यानंतर सदर अनोळखी व्यक्तीचा शोध सुरू करून पुढील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर गुप्त बातमीदारांमार्फत देखील सदर अनोळखी व्यक्तीचा शोध सुरू केला. त्यानुसार सदर अनोळखी व्यक्तीची ओळख पटवून त्यास ताब्यात घेतले व त्यानंतर त्याने महिलेचे हरवलेले सोन्याचे दागिने हे त्याला रस्त्यावर पडलेले सापडल्याचे कबूल केले. त्यानुसार त्या व्यक्तीने ते दागिने पनवेल शहर पोलिसांना परत केले. त्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी सदर महिलेस पोलीस ठाणे येथे बोलावून तिचे गहाळ झालेले सोन्याचे दागिने हे तिला परत केले.

# चिरनेर येथील अक्कादेवी धरणावर गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील अक्कादेवी धरण यंदा पहिल्या पावसातच तुडुंब भरले आहे. त्यामुळे रविवारच्या सुट्टीनिमित्त या धरणातील ओसंडून वाहणाऱ्या पाण्याखाली भिजण्याची मजा घेण्यासाठी तरुणाईने मोठी गर्दी केली आहे. तालुक्यात मागील आठवडा भरात समाधानकारक पाऊस झाल्याने दरवर्षी जुलै महिन्यात भरणारे अक्कादेवी धरण यंदा जून महिन्याच्या मध्यावरच तुडुंब भरून ओसंडून वाहत आहे. त्यामुळे हे छोटे धरण पर्यटकांसाठी पर्वणी ठरली आहे.

उरण, पनवेल व पेण तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात पावसाची दमदार बरसात झाल्याने चिरनेर येथील अक्कादेवी येथील उत्तर, पूर्व आणि दक्षिण अशा तीन दिशांना आलेल्या उंच डोंगराच्या कुशीत असलेल्या धरणाचे पाणी पश्चिमेच्या दिशेने ओसंडून वाहत आहे. येथील २५ सप्टेंबर १९३०च्या चिरनेर जंगल सत्याग्रहाची साक्ष देणाऱ्या अक्कादेवीच्या माळरानावर पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांची रेलचेल



वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.

मागील सहा दिवसांपूर्वी पुण्यातील मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून चार जणांना आपला जीव गमवावा लागला असून, ८० ते ८५ पर्यटक जखमी झाल्याची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यात सर्वत्र धरणे, धबधब्यांच्या पर्यटन स्थळी सुरक्षेच्या दृष्टीने पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे, मात्र उरण, नवी मुंबई, पनवेलपासून जवळच्या अंतरावर असलेल्या चिरनेर येथील अक्कादेवी धरणावर पर्यटकांना धोका नसल्याने पर्यटक पसंती देत आहेत.

पावसाळ्यात तीन डोंगराच्या बाजूने हिरवीगार शाल पांघरलेल्या तीन दिशांच्या डोंगरामध्ये रिमझिम बरसणारा पाऊस आणि उंचावरून फेसाळत धबधब्याचे पडणारे थंडगार पाणी अंगावर झेलण्यासाठी पर्यटक रविवारच्या सुट्टीमुळे अधिक येणे पसंती देत आहेत.

## निवडक

### कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव वेगाने आलेल्या कारने स्कूटीला दिलेल्या धडकेत महिलेचा मृत्यू झाला. तर महिलेचा पती गंभीर जखमी झाला. या अपघातप्रकरणी कारचालक विद्यार्थिनी विरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तिथी सिंग असे तिचे नाव आहे. ॲक्टिव्हा स्कूटी घेऊन गोपाळ यादव हे त्यांच्या पत्नीसह घाटकोपर येथील कामावरून पनवेल येथील घरी जात होते. ते स्कूटीवरून खारघर येथील हिरानंदानी ब्रिज उतरून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर आले. त्यावेळी कारचालकाने स्कूटीला खारघरजवळील हॉटेल हायवे ब्रेकर समोर धडक दिली. यात रेखा यादव, गोपाल यादव हे खाली पडले. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने रेखा यांचा मृत्यू झाला.

### उरण महाविद्यालयात योग दिन



**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून प्राजक्ता निकित पवार ह्या उपस्थित होत्या. प्रभारी प्राचार्य डॉ. एम.जी. लोणे, ज्येष्ठ प्रा. व्ही.एस. इंदुलकर, डॉ. एच. के. जगताप, प्रा. आर. टी. ठावरे, डॉ. पी. आर. कारुळकर, प्रा. रियाज पठाण, प्रा. पूजा गुप्ता, डॉ.दत्ता हिंगमिरे, डॉ. ए. आर. चव्हाण आदी उपस्थित होते.

### मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये योगसाधना



**पनवेल :** २१ जून रोजी खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये मोठ्या उत्साहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. ६०हून अधिक नागरिक व कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले होते. लोकांना निरोगी सवयी स्वीकारण्यास आणि त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यास प्रेरित करणारे असे आणखी उपक्रम हाती घेण्याचे आमचे ध्येय असल्याची प्रतिक्रिया मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी स्पष्ट केले.

### रिटघर विद्यालयात योग प्रात्यक्षिके



**पनवेल :** श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. खुटले मॅडम यांनी योग दिनाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यानंतर योगा मार्गदर्शक अमित पाटील यांनी विद्यालयातील पाचवी ते बारावी अखेर सर्व विद्यार्थ्यांचे योगाचे विविध प्रकार घेतले. त्यात ताडासन, भद्रासन, भुजंगासन, त्रिकोणासन, सूर्यनमस्कार, प्राणायम इत्यादी आसने करून दाखवली. त्याप्रमाणे विद्यालयातील विद्यार्थी, मुख्याध्यापक कारंडे सर व सर्व शिक्षकांनी योगासन केली व सर्व विद्यार्थी शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

### खारपाटील विद्या संकुलात योग दिन

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर येथील, पी.पी.खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलनात २१ जून रोजी,



आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी योग प्रशिक्षक जयराम ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली. कार्यक्रमाला प्राचार्य मिलिंद पट्टेबहादूर, प्रशासकीय अधिकारी व्ही.ए. पाटील पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर मुख्यध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मंदा घरत, स्मिता मसुरकर, आदी उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून विकासकामे




## कोप्रोली व भानघर येथे भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कोप्रोली आणि भानघर येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून सुमारे ७२ लाख रुपयांची विकासकामे करण्यात येणार आहेत. या कामांचे भूमिपूजन भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी (दि. २२) झाले.

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली ५० लाख रुपयांच्या निधीतून भानघर ते चिंचवली फाट्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण, तर १२ लाख रुपयांच्या निधीतून चिपळे ग्रुप ग्रामपंचायतीमधील कोप्रोली गावच्या स्मशानभूमीचे सुशोभीकरण व १० लाख रुपयांच्या निधीतून अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामांचा शुभारंभ अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमास भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप नेरे जि.प. विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, माजी सरपंच रमेश पाटील, शांताराम पोपटा, रमेश पाटील, प्रकाश तांडेल, नितीन पोपेटा, माजी उपसरपंच गणेश म्हस्कर, मुकेश फडके, धनंजय पाटील, रोशन पोपटा, प्रितेश डांगरकर, पोलीस पाटील दीपक पाटील, मदन मढवी, हिराजी पोपेटा रघुनाथ मोहिते, सागर मढवी, सुनील मढवी, जगन पोपेटा, नारायण हरिभाऊ माळी, नारायण बाळाराम माळी, अंकुश पाटील, अशोक फडके, संतोष म्हसकर, गुरुनाथ ठाकूर, धनंजय म्हसकर, लक्ष्मण फडके, रोशन पाटील, रोहित पाटील, नागेश म्हसकर, सावळाराम डांगरकर, महेश शहा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# खारघर योगा ग्रुपतर्फे स्नेहसंमेलन

## ◆ आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सुत्रे हातात घेतल्या पासून आपल्या देशाची संस्कृतीचा परिचय जगाला आणि आपल्या देशवासीयांना होत आहे. याचा अभिमान आपण बाळगायला लागलो आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर योगा ग्रुपच्या वतीने आयोजीत केलेल्या स्नेहसंमेलनामध्ये केले.

जागरीत योग दिवस शनिवारी सर्वत्र साजरा झाला. यानिमीत्त खारघर योग ग्रुपच्यावतीने स्नेहसंमेलनाचे आयोजन खारघर सेक्टर ४ मधील प्रणव हॉटेलच्या सभागृहात केले होते. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तसेच योगा ग्रुपच्यावतीने सुविधांसंदर्भात करण्यात आलेली मागणी पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

या स्नेहसंमेलनाला भाजपचे जिल्ह चिटणीस ब्रिजेश पटेल, युवानेते अमर उपाध्याय, योगा ग्रुपचे अध्यक्ष सदाशिव तुपे, दत्ता पांचाळ, जगन्नाथ तांदलेकर, विजय घारगे, मधुकर दिंडे, दिलीप चौधरी, गौतम गमरे, शंकर पवार, मोहन भागवत, निर्मला राऊत, नंदा घारगे आदी उपस्थित होते.

## टेम्पोच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** सिग्नलवर उभ्या असलेल्या स्कुटीला पाठीमागून भरधाव येणार्या टेम्पोने धडक दिली. या अपघातात स्कुटीवर पाठीमागे बसलेल्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना सायन-पनवेल मार्गावरील कळंबोली सर्कल येथे घडली. कळंबोली पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या टेम्पोचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

अपघातातील मृत व्यक्तीचे नाव नरेंद्र प्रभाकर त्रिवेदी असे असून ते नवीन पनवेल सेक्टर १६ मध्ये कुटुंबासह राहत होते. त्रिवेदी हे गुरुवारी सकाळी पुणे येथे नातेवाइकाच्या श्राद्धाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. तेथून ते रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास शिवनेरी बसने कळंबोली येथील मॅकडोनाल्डसमोरील रस्त्यावर उतरले होते. त्रिवेदी यांना घेण्यासाठी त्यांचा मुलगा हर्षित त्रिवेदी कळंबोली येथील बसस्टॉपवर स्कुटी घेऊन गेला होता. हर्षित वडिलांना घेऊन नवीन पनवेल येथील घरी जात असताना, कळंबोली सर्कल येथील सिग्नल लागल्याने उभा होता.

याचवेळी पाठीमागून टेम्पोने त्यांच्या स्कुटीला धडक दिली. त्यामुळे हर्षित आणि त्याचे वडील नरेंद्र त्रिवेदी हे दोघेही खाली पडले. या अपघातात नरेंद्र त्रिवेदी हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना तत्काळ एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले, मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. कळंबोली पोलिसांनी टेम्पोचालक सुखराम कांता कुरमी याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे जागतिक योग दिनाचे महत्त्व सर्व विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोहोचावे म्हणून स्कूलमध्ये श्री अंबिका योग कुटीर, ठाणे यांच्या योग प्रात्यक्षिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.



ज्यामध्ये स्कूलमधील इयत्ता पहिली ते नववीच्या सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभागी होऊन योग अभ्यास केला व आपल्या दैनंदिन जीवनात योगा करण्याच स्कूलला आश्वासित केले.

योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी योग विषयावर प्रश्नमंजुषा घेण्यात आली. तसेच पालक वर्गासाठी सहज योग यांच्या टीम मार्फत ताण-तणाव या विषयाला अनुसरून मेडिटेशन शिकवण्यात आले, ज्यामध्ये पूर्व प्राथमिक ते इयत्ता नववीपर्यंतच्या पालकांचा, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांचा समावेश होता. सहज योग हे विज्ञानाला अनुसरून कसे आहे याचा संपूर्ण विस्तृत माहिती यात देण्यात आली.

या दिवशी जागतिक संगीत दिवसही साजरा करण्यात येतो त्या निमित्ताने स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना वाद्याप्रती आदर प्रेमभावना निर्माण व्हावी म्हणून वाद्य बनविणे, वाद्यचित्र रंगकाम, वाद्य चित्र साकारणे त्याच्या विविध भागाची नावे लिहिणे, चिनी माती पासून वाद्य बनवणे अशा विविध प्रमाणावर उपक्रम घेण्यात आले व हा दिवस मोठ्या आनंदात उत्सवा सारखा साजरा करण्यात आला.



**उरण : सामाजिक कार्यकर्ते महेश भोसले यांचा वाढदिवस आनंद नगरातील स्वामी समर्थ मठ येथे साजरा करण्यात आला. या वेळी राजेश गावडे, पत्रकार दिनेश पवार, प्रदीप खैर, विलास काठे, नंदू पाटील, रमेश झावरे, बळीराम भोईर, वसंत म्हात्रे, कविवर्य चंद्रकांत कडू व स्वामीभक्त उपस्थित होते. सर्वांनी भोसले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : कामगार नाका येथील झोपडपट्टी ठिकाणी गटाराचे पाणी शिरत होते. ही बाब लक्षात येताच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पाठपुरावा करून नवीन गटार बांधून देण्यात आले. या कामावेळी माजी नगरसेविका भोईर यांच्यासह रोशन जाधव, तुषार कापरे आदी उपस्थित होते.**

# बालग्राम अनाथाश्रमात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रेसफुल हँड्स ट्रस्टने पनवेलच्या खांदा कॉलनीतील बालग्राम अनाथाश्रमात मुलांमध्ये सौहार्द वाढवणारा आनंदाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

बालग्राम क्टिव्हिटी हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम पायल मधोक यांनी मार्गदर्शन केले आणि आदरणीय पाहुणे अरविंद आणि डॉ. निलिमा मोरे आणि लता कुरियन, जीएचटीचे खजिनदार, स्वयंसेवक कृतिशी यादव, एन जैजराले, स्वयंसेवक कृतिशी यादव, एन. जैजराले यांनी मार्गदर्शन केले.

विजय खुटाळे, मिताली मंडल, उर्मिला जोशी, मनजीत कौर, नॅन्सी कुकरेजा, निशू सेठी आणि ग्रेसफुल टीमचे सदस्य.

ऋब्द्ध च्या खजिनदार सुश्री लता कुरियन यांच्या स्वागतपर भाषणाने आणि सुश्री पायल मधोक यांच्या प्रेरक भाषणाने सुरुवात करून, दिवसाची सुरुवात उत्साहवर्धक सराव व्यायामाने झाली.





**पनवेल : इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन, कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था पनवेल, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंटस्ट्रियल टाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त लाईफ लाईन हॉस्पिटल येथे योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर तसेच डॉ. जयश्री पाटील, शुभदा भगत, ॲड. शुभांगी बहिरा, योगा टिचर रुतुजा वालेकर, देवयानी पोटे, सोनाली परमार, डॉ. प्रिती गुरमे, ॲड. शिल्पा नागावकर, शितल गायकवाड, सुलोचना कल्याणकर, डॉ. राजश्री बगाडे, मिहिका भगत आदी उपस्थित होत्या.**



**कळंबोली :** जागतिक योग दिवस भाजप कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात झाला. या वेळी माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, बबन मुकादम, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, सरचिटणीस दिलीप बिष्ट, महिला मोर्चा अध्यक्ष मनीषा निकम, केशव यादव, प्रकाश शेलार, दत्ता भिनावड आदी उपस्थित होते. पतंजली योग समितीचे योगगुरु र.प. यादव व संजय यादव यांनी योगसाधना शिकवली.

## संपादकीय


# योग्य वेळी होणार कर्जमाफी

कृषी क्षेत्राला प्राधान्य देत राज्य कारभार करणारे महाराष्ट्रातील महायुती सरकार शेतकरीवर्गासाठी वेळोवेळी विविध दिलासादायक निर्णय घेत असते. सरकारचे प्रमुख असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीवर भाष्य करत योग्य वेळी हा निर्णय घेतला जाईल याचे संकेत दिले आहेत.

**महायुती सरकारने गेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांना दिलेले कर्जमाफीचे आश्वासन हे जाहीरनाम्यातील एक महत्त्वाचे वचन होते, कारण महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतकरी अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. त्यांचा शेती व्यवसाय अडचणीत असून अनेकदा उत्पादन खर्चही वसूल होत नाही. अशा स्थितीत कर्जबाजारीपणात अडकलेला शेतकरी आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग पत्करतो, ही बाब एकंदर समाजासाठी अत्यंत गंभीर आहे. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रासह देशभरात हवामानातील अनियमितता वाढली आहे. अवकाळी पाऊस, चक्रीवादळ, गारपीट, पावसाचे अल्प किंवा अति प्रमाण या गोष्टींनी शेतीचे गणित कोलमडले आहे. यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. कधी कधी शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन घातलेली पिके अवकाळी पावसामुळे जमीनदोस्त होतात. याचा थेट परिणाम त्यांच्या उत्पन्नावर होतो. शेतकऱ्याला या त्रासदायक परिस्थितीत कर्ज फेडणे शक्य न राहिल्याने तो हतबल होतो. ग्रामीण भागात कामगारांची संख्या कमी होत चालल्याने मजुरांची वानवा निर्माण झाली आहे. शहरांकडे वाढलेले स्थलांतर, मनरेगासारख्या योजनांमुळे मिळणाऱ्या कामांमधील स्थैर्य आणि शेतीतील कष्टदायक जीवनशैलीमुळे मजूर शेतीकडे वळत नाहीत. त्यामुळे शेतीसाठी मजूर मिळवणे ही शेतकऱ्यांसमोरील आणखी एक अडचण बनली आहे. परिणामी शेतीचा उत्पादन खर्च वाढतो आणि नफा घटतो. शेतीतील अपयश, कर्जाचा वाढता भार, कुटुंबाची जबाबदारी या साऱ्या गोष्टींमुळे काही शेतकरी आत्महत्येचा टोकाचा मार्ग निवडतात. ही गोष्ट सामाजिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही चिंताजनक आहे. सरकारकडून विविध योजना राबवण्यात येतात, पण सातत्याने येणारी विविध संकटे शेती क्षेत्रास मारक ठरतात. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुण्यात माध्यमांशी संवाद साधताना, कर्जमाफी ही योग्य वेळी केली जाईल. सरकार शेतकऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे आहे, असे सांगितले. सरकारकडून विविध योजना व निर्णयांतून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामध्ये पीक विमा योजना, सिंचन योजना, शेतकरी सन्मान निधी, शाश्वत शेतीसाठी प्रशिक्षण, ई-पीक नोंदणी व तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळ बैठकीतही शेतकऱ्यांसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात येतात. यामध्ये कर्जमाफीचा विषयही चर्चेचा भाग आहे, परंतु सरकारचा उद्देश केवळ कर्जमाफी करून शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा देणे नसून दीर्घकालीन उपाययोजना राबवून शेतकरी स्वावलंबी बनवणे हा आहे. त्यामुळे उत्पादन खर्चात कपात, बाजारभावात स्थैर्य, मालाची हमीभावाने विक्री, साठवणूक व प्रक्रिया उद्योगाला चालना देणे यावरही भर दिला जात आहे. कर्जमाफी ही केवळ एक राजकीय घोषणा नसून ती शेतकऱ्यांसाठी आर्थिक नवसंजीवनी असू शकते. म्हणूनच ती घाईघाईने जाहीर न करता पूर्ण अभ्यास करून लागू करणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना योग्य लाभ मिळावा हे अभ्यासू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जाणतात. म्हणूनच योग्य वेळी कर्जमाफी करून शेतकऱ्यांना आधार दिला जाणार आहे.**

# कर्जतमधील 'त्या' इमारतीच्या अनेक आठवणी...





**खबरबात**
विजय मांडे

दोन-तीन दिवस पडलेल्या मुसळधार पावसामुळे मोडकळीस आलेली कर्जत नगर परिषदेची कौलरू असलेली जुनी इमारत कोसळली. घटना दुपारी तीनच्या सुमारास घडली. ही इमारत कोसळत असताना इमारतीच्या आजूबाजूला बसणाऱ्या फेरीवाल्यांची एकच धावपळ उडाली. ही इमारत जागेवरच कोसळल्याने कोणालाही साधे खरचटलेसुद्धा नाही. ही इमारत अनेक पिढ्यांची साक्षीदार आहे. आता मात्र या इमारतीच्या आठवणीच शिल्लक राहतील.

ही इमारत खूप जुनी आहे. त्या वेळच्या कुलाबा लोकल बोर्डाने ती बांधली होती. धर्मशाळा अशी नोंद या इमारतीची आहे. येथे सुरुवातीला वाचनालय सुरू केले होते. कर्जत ग्रामपंचायतीचा गाडा येथून हाकला गेला. पहिले सरपंच वकील रघुनाथ तथा भाऊसाहेब गुप्ते हे सलग पाच वेळा बिनविरोध निवडून आले होते. ते पंचवीस वर्ष सरपंच होते. त्यांच्यासह लियाड्रॉ सेबास्टियन डिमेलो, लक्ष्मीकांत तथा बाबुराव दिवाडकर, वसंत दगडे, शांतीलाल परमार, तुकाराम सुर्वे, अनंत जोशी आदींनी सरपंच म्हणून येथूनच काम केले होते. कर्जत ग्रामपंचायतमधील कर्जत, मुद्रे (बुद्रुक), मुद्रे (खुर्द), भिसेगाव आणि गुंडगे ही पाच गावे, दहिवली ग्रामपंचायत आणि शिरसे ग्रामपंचायतीमधील आकुर्ले गाव अशी सात गावे मिळून १९९२ साली ऑक्टोबर महिन्यात नगर परिषद उदयास आली. प्रथम नगराध्यक्ष रमेश चंदने, धनंजय चाचड, वसंत भोईर, वनिता म्हसे, शरद लाड, शुभांगी जाधव, स्मिता पतंगे, सुनंदा कांगणे, अस्मिता मोरे यांनी याच कौलरू इमारतीतून नगर परिषदेचा कारभार केला होता.

पहिले सरपंच वकील भाऊसाहेब गुप्ते असताना त्यांच्या पंचवीस वर्षांच्या कारकिर्दीत अनेक विकासकामांचे निर्णय घेण्यात आले. तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री सी.डी. देशमुख त्या वेळी कर्जतला आले होते. त्यांनी भाऊसाहेबांच्या घरी दोन दिवस पाहुणचार घेतला. त्या वेळी याच इमारतीतून भाऊसाहेब ग्रामपंचायतीचा कारभार सांभाळत होते. रस्त्यांचे रुंदीकरण करण्याचा निर्णय सर्वप्रथम माजी आमदार तुकाराम सुर्वे यांनी अनेकांचा रोष ओढवून घेतला व अंमलबजावणीसुद्धा केली तसेच ग्रामपंचायतीची चांगली इमारत व्हावी यासाठी घेतलेला निर्णय याच इमारतीमध्ये बसून घेतला, मात्र नंतर पाया भरणी झालेला हा प्रकल्प काही विरोधकांमुळे पूर्ण झाला नाही. अनंत जोशी सरपंच असताना अनेक कामे करण्यात आली. त्या वेळी पळसदरी तलावावर आधारित पाणी योजना मंजूर करण्यात आली व ती पूर्ण करण्यात आली. याचा निर्णयसुद्धा याच इमारती मधील. धनंजय चाचड हे अत्यंत अभ्यासू व्यक्तीमत्व. त्यांनी चार वेळा नगराध्यक्ष पद सांभाळले होते. कर्जत शहरासाठी पाणी योजना व्हावी यासाठी राजकारणाच्या पलीकडे जाऊन आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीमुळे ही योजना व्हावी यासाठी प्रयत्न केले. केवळ ९९ लोकसंख्या जास्त असल्याने ही योजना अडचणीत आली होती, मात्र त्यांनी पाठपुरावा करून ही योजना मंजूर करून घेतली. यामध्ये नगरसेवक प्रवीण गांगल यांची त्यांना मोलाची साथ मिळाली होती. हा निर्णयदेखील याच इमारतीत झाला.

वसंत भोईर यांनी आपल्या कार्यकाळात या इमारतीच्या अर्ध्या भागाची दुरुस्ती करून सभागृह आणि नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र्य दालने तयार केली होती आणि पोट माळा तयार करून काही विभागाच्या कर्मचाऱ्यांची बसण्याची व्यवस्था केली होती. ही घटना २०००-२००१ सालातील. या इमारतीतून अनेक निर्णय घेण्यात आले. २००४ साली थेट नगराध्यक्षपदी वनिता म्हसे निवडून आल्या त्या शिवसेनेच्या होत्या, मात्र विरोधी पक्षाचे जास्त नगरसेवक निवडून आले होते. त्यामुळे अनेक निर्णय घेताना अडचण होत होती. तरीही कर्जतच्या विकासाला कलाटणी देणारी पेज नदीवर आधारित कर्जत शहर वाढीव पाणीपुरवठा त्यांच्याच काळात पूर्ण झाली. त्या वेळी त्या याच इमारतीतून कारभार सांभाळत होत्या. २०१३ साली अस्मिता मोरे नागराध्यक्ष असताना नगर परिषदेच्या नवीन इमारतीची उभारणी करण्यात आली. तेव्हापासून ही इमारत रिकामी होती. या इमारतीच्या दुरुस्त केलेल्या भागात आधार केंद्र सुरू आहे. या इमारतीच्या लागूनच अनेकांनी उपोषणे केली आहेत. त्या शेकडो उपोषणाची साक्षीदारही इमारत आहे.

या इमारतीच्या जागी नवीन इमारत व्हावी अशी अनेकांची अपेक्षा होती, मात्र तांत्रिक अडचणीमुळे येथे काहीच करता येत नव्हते. येथे नव्याने इमारत बांधताना वाणिज्य गाळे बांधून चार-पाच मजली पार्किंग तयार केल्यास कर्जतकरांची पार्किंगची समस्या मिटेल, तर काहींचे म्हणणे असे आहे की, या इमारतीच्या जागी सुशोभीकरण करून शहराच्या सौंदर्यात भर घालावी. नगर परिषदेकडून धोकादायक इमारतींना नोटीसा दिल्या जातात व त्या पाडण्यासाठी सांगतात. मग ही इमारत आतापर्यंत का पडली नाही? असा प्रश्न कर्जतकरांना पडला आहे. काहीही असो आता या इमारतीच्या आठवणीच शिल्लक राहतील, हे मात्र खरे!



## बदलते तंत्रज्ञान

# काय आहे 'जीमेल अनसबस्क्राइब स्कॅम'?

ऑनलाईन फसवणुकीच्या घटना गेल्या काही दिवसात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. फसवणूक करणारे आरोपी वेगवेगळे मार्ग शोधून नागरिकांना गंडा घालताना दिसत आहेत. आपल्यापैकी बऱ्याच जणांना ई-मेलवर अनेक प्रकारचे प्रोमोशनल ईमेल, खोट्या जॉब ऑफर्स आणि फीडबॅक रिक्वेस्ट पाठवल्या जात असतील. यामुळे तुमचा जीमेल स्टोरेज भरू लागते आणि यापासून सुटका करून घेण्यासाठी आपण ई-मेल 'अनसबस्क्राइब बटण'ची मदत घेतो. तुम्ही देखील असेच काही करत असाल तर तुम्हाला वेळीच सावध होण्याची आवश्यकता आहे, कारण फसवणूक करणारे आता या अनसबस्क्राइब बटणचाच उपयोग फसवण्यासाठी करत आहेत.





'द वॉल स्ट्रीट जर्नल'च्या रिपोर्टनुसार ई-मेलमध्ये आपल्याला जो अनसबस्क्राइब लिंक दिसते ती नेहमीच खरी नसते. बऱ्याचदा फसवणूक करणारे तुम्हाला अशी लिंक पाठवून ई-मेल ॲक्टिव आहे की नाही हे तपासतात. एकदा का तुम्ही अनसबस्क्राइब लिंकवर टॅप केलं की फसवणूक करणाऱ्यांना लक्षात येते की हा ईमेल ॲक्टिव आहे, त्यानंतर हे आरोपी पुढील पावले टाकू लागतात.

द वॉल स्ट्रीट जर्नलच्या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे की अनोळखी सेंडरकडून पाठवण्यात आलेल्या ईमेलमध्ये अनसबस्क्राइब लिंक असेल, तर त्यावर चुकूनही क्लिक करू नका. असे केल्याने तुमचा फोन, लॅपटॉप किंवा ज्या डिव्हाईसवरून तुम्ही क्लिक केले आहे त्याचा एक्सेस फसवणूक करणाऱ्याकडे जाऊ शकतो. याशिवाय तुमची खाजगी माहिती देखील चोरी केली जाऊ शकते.

**अशी घ्या काळजी**

* अनोळखी सेंडरकडून येणाऱ्या ई-मेलवर क्लिक करण्याएवजी त्या ई-मेलला स्पॅम असे मार्क करा, ज्यामुळे जीमेल पुढच्या वेळी तुम्हाला असे ई-मेल येण्यापासून वाचवेल.
* तुम्हाला जर पाठवणाऱ्यावर विश्वास नसेल, तर ई-मेलमध्ये दिसत असलेल्या अनसबस्क्राइब लिंकवर क्लिक करण्याची चूक करू नका.
* हाईड माय ई-मेलसारख्या प्रायव्हसी टूल्सचा वापर करा, हे टूल तुमच्या खरा ई-मेल अड्रेस लपवून ठेवण्याचे काम करेल.
* ई-मेल ॲप आणि अँटीव्हायरस सॉफ्टवेयर हे कायम अपडेट करत राहा, यामुळे अशा धोक्यांपासून संरक्षण होईल.

# भारतीय जनसंघाचे संस्थापक श्यामा प्रसाद मुखर्जी



**निमित्त**

थोर राष्ट्रीय नेते, भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष व शिक्षणतज्ज्ञ अशी श्यामा प्रसाद मुखर्जी यांची ओळख राहिली आहे. आज त्यांचा पुण्यस्मरण दिन. त्यांचा जन्म ६ जुलै १९०१ जून रोजी कलकत्त्यात (आताचे कोलकाता) प्रसिद्ध मुखर्जी घराण्यात झाला. त्यांचे वडील आशुतोष मुखर्जी विख्यात न्यायाधीश व पुढे कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू, तर त्यांच्या आईचे नाव जोगमायादेवी.

श्यामा प्रसाद कलकत्ता विद्यापीठातून बीए झाले (१९२१). विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह सुधादेवी या मुलीशी झाला (१९२२). त्यांना दोन मुले व दोन मुली झाल्या. विद्यापीठाच्या सीनेटवर त्यांची निवड झाली. त्यानंतर त्यांनी बीएल (१९२४) ही पदवी घेऊन इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास केला व ते बॅरिस्टर झाले (१९२७). लंडनहून परत आल्यावर त्यांनी वकिली सुरू केली. ते बंगाल कायदेमंडळावर निवडून आले (१९२९), पण वर्षभराने गांधीजींच्या देशव्यापी कायदेभंग आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी त्यांनी कायदेमंडळाचा राजीनामा दिला. या वेळी काँग्रेसच्या एकूण धोरणाविषयी ते नाराज होते. परिणामतः ते हिंदू महासभेकडे वळले.

पुढे श्यामा प्रसाद कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले (१९३४). त्याच वर्षी त्यांच्या पत्नी सुधादेवी निवर्तल्या. त्यानंतर अखेरपर्यंत त्यांनी दुसरा विवाह केला नाही. हिंदू महासभेतर्फे ते १९३७मध्ये बंगालच्या कायदेमंडळावर पुन्हा निवडून आले. मुस्लिम लीगच्या १९४०च्या लाहोर ठरावानंतर त्यांनी फाळणीविरूद्ध देशभर प्रचार केला. त्या आधी काही काळ ते हिंदू महासभेचे हंगामी अध्यक्षही होते. लीग मंत्रिमंडळाच्या पराभवानंतर ते बंगालच्या फझलुल हक मंत्रिमंडळात दाखल झाले, पण भारत छोडो आंदोलनाच्या वेळी त्यांनी गांधीजी व इतर काँग्रेस नेत्यांची सुटका आणि संभाव्य जपानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या स्थापनेची मागणी केली. या प्रश्नांवर तड लावण्यासाठी नंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

१९४३मध्ये बंगालचा दुष्काळ निवारण्यासाठी श्यामा प्रसादांनी खूप कष्ट घेतले. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरु यांच्या पहिल्या केंद्रीय मंत्रिमंडळात ते उद्योग आणि पुरवठामंत्री झाले. त्या आधीच हिंदू महासभेमध्ये अहिंदूंनाही प्रवेश द्यावा या मुद्यावर त्यांनी त्या पक्षाचा राजीनामा दिला होता. मंत्री म्हणून त्यांनी फार अल्प काळ काम केले. नेहरू-लिकायत अलीखान कराराच्या निषेधार्थ त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला (१९५०). तथापि, त्यांच्या कारकीर्दीत चित्तरंजन चलनशील यंत्र कारखाना व सिंद्री खत कारखाना हे दोन भव्य प्रकल्प त्यांच्या प्रयत्नांनी सुरू होऊन भारताच्या औद्योगिक विकासात मोलाची भर पडली.

काँग्रेसला शह देण्यासाठी श्यामा प्रसाद यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली (१९५१). १९५२च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ते जनसंघातर्फे लोकसभेवर निवडून आले. संसदेत त्यांनी विरोधी पक्षांची एक राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केली. जम्मू व काश्मीरच्या संपूर्ण विलीनीकरणासाठी त्यांनी अभियान सुरू केले. या आंदोलनानिमित्त प्रत्यक्ष काश्मीरमध्ये जाऊन प्रचार करण्याचा त्यांनी निश्चय केला. जम्मू-काश्मीरचे तत्कालीन मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांच्या शासनाने त्यांच्या राज्यप्रवेशावर बंदी घातली. बंदी मोडून जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश केल्यावर त्यांना अटक झाली. तुरुंगवासातच त्यांचा २३ जून १९५३ रोजी मृत्यू झाला. **(साभार : विकासपीडिया)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# दुधीची साल फेकून देता? मग थांबा!

दुधीची भाजी सगळ्यांनाच आवडते, असं नाही. काही जण भाजी पाहिल्यानंतरच खाण्यास नकार देतात, पण जर दुधीचा हलवा बनवला, तर मात्र ते अगदी आवडीने खातात, पण ही भाजी एकंदरीतच आरोग्यदृष्ट्या भरपूर फायदेशीर असते. ती भाजी खरेदी करताना कोणत्या गोष्टी बघून घेतल्या पाहिजेत तसेच भाजी बनविताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत याबद्दल जाणून घेऊ...



मुंबईतील पी.डी. हिंदुजा हॉस्पिटलच्या क्लिनिकल डाएटिशियन चैताली राणे यांनी सांगितले की, दुधीमध्ये पाण्याचे प्रमाण सर्वाधिक असते, जे हायड्रेशन आणि भूक नियंत्रित करण्यास मदत करू शकते. त्यात फायटोकेमिकल्स आणि दाहकविरोधी गुणधर्म असतात, जे शरीरात निर्माण होणारा ताण कमी करण्यास मदत करतात. ही कृती हृदयाचे आरोग्य राखण्यास मदत करते. त्यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब व हृदयरोग असलेल्या व्यक्तींसाठी दुधीची भाजी खाणे भरपूर फायदेशीर ठरू शकते.

दुधीची भाजी पोटॅशियम, लोह, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे बी कॉम्प्लेक्स व सीसारख्या आवश्यक पोषक घटकांचा समृद्ध स्रोत आहे. कमी चरबीयुक्त पदार्थ आणि उच्च आहारातील तंतुमय गुणधर्मासह दुधी हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे, कारण दुधी रक्तदाब नियंत्रित करते आणि ताण व कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करते. त्याचबरोबर अपचन, अल्सर, तणाव आणि नैराश्याला प्रतिबंधित आणि नियंत्रित करण्यास मदत करते, कारण ते शरीरात मुक्त आम्ल रॅडिकल्सची निर्मिती कमी करतात; ज्यामुळे इन्सुलिन संवेदनशीलता व्यवस्थापित करण्यास मदत होते.

भाजी खाल्यानंतर हे सगळे आरोग्य फायदे तुम्हाला तेव्हाच मिळतील जेव्हा तुम्ही भेसळमुक्त दुधी खरेदी कराल. जिंदाल नेचरक्योर इन्स्टिट्यूटच्या मुख्य आहारतज्ज्ञ सुषमा पी. एस. यांनी रसायनमुक्त, भेसळमुक्त दुधी ओळखण्याचे सोपे मार्ग सांगितले. मार्केटमधून दुधी खरेदी करताना तो आकारापेक्षा मोठा, ज्याचा रंग हलका हिरवा असेल आणि त्याची पोत कडक असेल असाच दुधी निवडा. ज्या भोपळ्यावर ओरखडे, हलके डाग आहेत, असा दुधी खरेदी करू नका. ताज्या दुधीचा सुगंध मातीसारखा आणि सौम्य असतो. दुधी खरेदी करताना विचित्र किंवा तीव्र रसायनाचा वास येत असेल, तर तो अजिबात खरेदी करू नका. सेंद्रिय शेती पद्धतींना पाठिंबा दिल्याने शाश्वत आणि आरोग्यदायी अन्न वापरण्यासदेखील प्रोत्साहन मिळते.

# खोपोली रेल्वेस्थानक समस्यांच्या गर्तेत

## उपाययोजनांची मागणी



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरांमध्ये खोपोली शहराचा अग्रक्रम आहे. शहरातील मुख्य रेल्वे स्थानक खोपोली असून मध्य रेल्वे वरील हे शेवटचे स्थानक आहे, पनवेल शहरानंतर झपाट्याने विकसित होणारे खोपोली शहर याची वाढती लोकसंख्या त्याप्रमाणे परिसरातील विविध कारखाने, विविध शासकीय कार्यालय, बँका, शाळा, महाविद्यालय यामुळे खोपोली रेल्वे स्थानकात नेहमीच गर्दी असते, हजारो प्रवासी येथून मुंबई व इतर ठिकाणी जात असतात.

खोपोली रेल्वे स्थानकात सुविधांचा अभाव असून, या स्थानकाबाहेर पावसाळ्यात तर तुंबलेले पाणी, चिखलाचे साम्राज्य, व परिसरात कचऱ्याचे ढिगारे यामुळे या परिसराला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. खोपोली स्थानकातून बाहेर पडल्यानंतर मोठ्या प्रमाणात दुर्गंधीमुळे प्रवाशांमध्ये रेल्वे प्रशासनाच्या विरोधात नाराजी आहे. खोपोली प्रवासी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सातत्याने रेल्वे प्रशासनाश संपर्क साधून त्याचप्रमाणे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनाही या सर्व समस्यांची वेळोवेळी कल्पना देऊ न ही याकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल प्रवासी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

नुकताच पावसाळा सुरू झाल्यामुळे या परिसरातील परिसर व काही प्रमुख पर्यटन स्थळे पाहण्यासाठी विकेंडला पर्यटकांची प्रचंड गर्दी असते, अनेकदा पर्यटक आल्यानंतर रेल्वे स्थानकाच्या परिसरातील दृश्य पाहून नाराजी व्यक्त करतात. प्रशासनाची परिसरात मोठी जागा असून रेल्वे प्रशासनाने ठरवले मोकळा भाग सुशोभित करू शकते, पण अधिकाऱ्यांची मानसिकता नसल्यामुळेच हे दृश्य दरवर्षी पहावयास मिळते. नगर परिषदेचा हद्द आहे तो रस्ता डांबरीकरण करण्यात आला, मात्र रेल्वेच्या हद्दीतील रस्ता तसाच दगड मातीचा असल्याने पाऊस मोठ्या प्रमाणात पडल्यानंतर त्या ठिकाणी पाणीच पाणी व चिखलाचे साम्राज्य असते. सायंकाळी सहा ची ट्रेन गेल्यानंतर दोन तास एकही गाडी मुंबई दिशेकडून येत नसल्याने अनेक वर्ष ही मागणी रेल्वे प्रशासनाकडे प्रलंबित आहे.

रेल्वे हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात टपऱ्या वाढल्याने या परिसराला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात टपऱ्या वाढत असताना रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष की चिरीमिरी मिळते. असा सवाल प्रवासी करीत आहेत. रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या परिसरालहळ पाहणी करून प्रश्न सोडवावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अनेकदा रेल्वेचे अधिकारी कर्जत रेल्वे स्थानकापर्यंत येत असतात त्यांनी एक दिवस तरी खोपोली रेल्वे स्थानकाला भेट द्यावी, अशी प्रवासी संघटनेची मागणी आहे.

# पर्यटकांच्या वाहनांना मच्छी मार्केटमुळे अडथळा

## रेवदंडा समुद्रकिनारी जाणाऱ्या मार्गावर वाहतूक कोंडी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्रकिनारी जात असलेल्या हायस्कुल नजीकच्या रस्तात मच्छी मार्केटच्या गर्दीने तेथून ये-जा करत असलेल्या पर्यटकांचा वाहनांना अडथळा निर्माण होवून वाहतुक कोंडी नित्याने होत असते.

रेवदंड्याला २ कि.मी. अंतराचा सरळ, लांबलचक समुद्र किनारा लाभलेला आहे, समुद्र किनारा स्वच्छ, सुंदर तसेच सुरक्षीत असल्याने पर्यटक, पै-पाहूणे नित्याने भेटीस येतात. पर्यटकांना राहण्यासाठी लॉज, कॉटेज सुविधा सुध्दा समुद्र किनारा नजीक स्थानिकांनी उपलब्ध केल्या आहेत. नित्याने पर्यटकाची गर्दी येथे होत असते, विशेषतः शनिवार, रविवार, तसेच सुट्टीच्या दिवशी पर्यटक मोठ्या संख्येने येथे येत असतात.

रेवदंडा हायस्कुल येथून समुद्र किनारी जाण्याचा मार्ग आहे, मात्र या मार्गात रेवदंडयातील मच्छी मार्केट येत आहे. तेथे मच्छी विक्रेत्या महिला तसेच मच्छी खरेदी ग्राहक यांची गर्दी असते. तसेच तेथूनच एक मार्ग थेरोंडा गावाकडे जातो. या ठिकाणी समुद्र किनारी जाण्यासाठी पर्यटकांची लहान मोठी वाहने नित्याने जा-ये करत असतात, तर थेरोंडा गावात जा-ये करण्यासाठी लहान मोठी वाहने या रस्ताने नित्याने असतात. मच्छी मार्केटच्या येथे दुर्तफा मच्छी विक्रीसाठी बसलेल्या महिला व खरेदीचे ग्राहक त्यामुळे हा रस्ता गर्दीचा असतो. परिणामी या रस्तात मच्छी मार्केटची गर्दीत येथून जा-ये करत असलेल्या पर्यटक तसेच थेरोंडा गावाकडील लहान मोठया वाहनांने वारंवार वाहतुक कोंडी निर्माण होते.

वाहतुक कोंडी हा नित्याचा प्रकार आहे, येथे मच्छी मार्केट महत्वाचे आहे, तसेच पर्यटकांचा समुद्र किनारी जा-ये करणारा मार्ग सुध्दा तेव्हढाच महत्वाचा आहे. संबधीतानी मात्र याबाबत गांभिर्याने लक्ष्य देवून नित्याने होत असलेली वाहतुक कोंडी दुर करावी, अशी मागणी केली जात आहे.

# नेणवली शाळेत योग संगम कार्यक्रम



**पाली : प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्त नेणवली शाळेत 'योग संगम' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. २०२५-२६ च्या जागतिक योग दिनाची थीम म्हणजे एक पृथ्वी, एक आरोग्य ह्यासाठी योग आरोग्य सुसंवाद व सजगता वाढीस लागणे. हा मुख्य उद्देश ठेवून आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची योगासने सादर केली.

सकाळी ६.३० वाजता सुरू झालेल्या या योग संगमात विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने आणि उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सर्वप्रथम योग संगम कार्यक्रम बाबत माहिती तसेच टीव्हीवर आयुष मंत्रालय योग चित्रफित दाखवून मार्गदर्शन मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके ह्यांनी केले.

या वेळी विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, प्राणायाम, पद्मासन, वृक्षासन यांसारख्या अनेक योगासनांचे प्रात्यक्षिक केले. योगाचे महत्त्व, त्याचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी असलेले फायदे याबद्दलही यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. योगामुळे एकाग्रता वाढते, ताण कमी होतो आणि शरीरात ऊर्जा टिकून राहते, असे या वेळी सांगण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजले आणि त्यांनी पालकांसोबत योगासने करून निरोगी जीवनाचा संदेश दिला. नेणवली शाळेने जागतिक योग दिनानिमित्त आयोजित केलेला हा 'योग संगम' उपक्रम यशस्वी ठरला. या कार्यक्रमासाठी विषय शिक्षक रवींद्र हंबीर, उपशिक्षक गणपत वरगडे, शंकर जाधव ह्यांनी तयारी केली.

# पेझारी येथील शाळेत योग दिन

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा पेझारी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. योग दिनाचे मार्गदर्शन करण्यासाठी पतंजली योग साधना केंद्र हरिद्वार सदस्य तथा उपकेंद्र पेझारी अध्यक्ष भरत कहाणे व अलिबाग तालुक्याचे माजी गटशिक्षणाधिकारी तथा योग केंद्राचे सदस्य नितीश पाटील, कहाणे मॅडम व इतर सदस्य उपस्थित होते.

श्री कहाणे सरांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व आपल्या जीवनात अनन्य साधारण असल्याचे पटवून सांगितले त्यानंतर सरांनी व त्यांच्या टीमने सूर्यनमस्कार व योगासनांची प्रात्यक्षिके स्वतः करून दाखविली व विद्यार्थ्यांकडून करून घेतली. सदृढ व निरोगी आरोग्यासाठी योगा किती महत्वाचा आहे हे या वेळी पटवून देण्यात आले.





**खालापूर : जागतिक योग दिनानिमित्त प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूल खोपोली येथे बूज हास्य क्लब व पंतजली भारत स्वाभिमान रायगड यांच्या माध्यमातून योग शिबिर झाले. या शिबिरात अनेक शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध योगासने केली.**

# सुधागडच्या तिवरे शाळेत विद्यार्थ्यांना वह्या वाटप



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील रा. जि. प. शाळा तिवरे येथे जय भवानी ग्रामविकास सामाजिक व सांस्कृतिक मंडळ रासळवाडी यांच्याकडून नुकतेच विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या.

या कार्यक्रमासाठी सुधागड तालुक्याचे तहसीलदार उत्तम कुंभार, तिवरे माजी सरपंच मनोहर देशमुख यांच्यासह चंद्रकांत जाधव, कृष्णा मोरे, अरुण मोरे, पेडली तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस पाटील, मुख्याध्यापिका श्रावणी मोरे, शिक्षक रवींद्र आंधळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व ग्रामस्थ तिवरे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मुख्याध्यापिका श्रावणी मोरे यांनी मंडळ अध्यक्ष श्रीकांत मोरे, चंद्रकांत जाधव, कृष्णा मोरे, अरुण मोरे, अशोक मोरे, किशोर मोरे, अनिल मोरे, सुनील मोरे, रामदास मोरे, अमृत मोरे, सखाराम मोरे, ज्ञानेश्वर मोरे, भागवत मोरे, अनंत मोरे, राजेश मोरे, रमेश मोरे, शैलेश मोरे, शिरीष मोरे, ऋषिकेश मोरे, कार्तिक मोरे, सौरभ मोरे या सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन शिक्षक रवींद्र आंधळे यांनी केले.

# 'चौकमधील वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी मंत्र्यांसोबत बैठक घेणार'

**चौक : प्रतिनिधी**

चौक परिसरात वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा याने परिसरातील सर्वच त्रासून गेले आहेत, यावर उपाय योजना करण्यासाठी विद्युत पुरवठा मंत्री यांच्याबरोबर बैठक घेण्यात येणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी सांगितले.

चौक परिसरात वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा याने परिसरातील नागरिकांना, विद्यार्थी, व्यापारी, दुग्ध व्यवसाय, झेरॉक्स दुकानदार यांच्यावर संक्रांत आली आहे, अवकाळी वादळाने, पावसाने पूर्णपणे वीज वितरण कंपनी ढेपाळली आहे, यांनी सुधारणा होत असताना पुन्हा जोरदार पाऊस वारा यांनी त्रास वाढवला आहे. दोन दोन दिवस अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. येथील कनिष्ठ अभियंता रजेवर आहेत की सुट्टी वर हेही कळण्यास मार्ग नाही. खालापूर येथील अभियंता यांना वेळ नसतो, त्यामुळे येथील जनता खूपच त्रासात आहे.

एका कार्यक्रमाला आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर हे आले असता मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे व उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी विद्युत पुरवठा खंडित होत असल्याचे सांगितले, तेंव्हा येत्या आठवड्यात वीज मंत्री यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे सांगून लवकरच वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.



# खालापूर पंचायत समिती येथे योग शिबिर



**चौक : प्रतिनिधी**

पंचायत समिती खालापूर येथे विशेष योग सत्र जल्लोषात साजरा करताना योग आणि बरंच काही हे सत्र अत्यंत महत्त्वाचे ठरले. अश्वपरीस फाऊंडेशनच्या माध्यमातून जागतिक योग दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शरीर, मन आणि आत्मा यांच्यातील सुसंवाद साधणारी एक दिव्य संधी साधण्यासाठी अश्वपरीस फाऊंडेशनने एक विशेष well being सत्र आयोजित केले. योग हे केवळ व्यायाम नव्हे, तर एक अध्यात्मिक शिस्त आणि शास्त्रीय जीवनशैली आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात, शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी योगाचे महत्त्व अनमोल आहे. त्याचबरोबर मनाचा व शरीराचा समतोल कसा राखवा याचे प्रशिक्षण म्हणजे योग, असे खालापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

या वेळी पंचायत समिती मधील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. अश्वपरीस फाऊंडेशन नेहमीच आपल्या सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून अशा प्रकारचे वैविध्य पूर्ण उपक्रम आयोजित करीत आहे. या सत्रात सहभागी होत आपण आपल्या आरोग्यासाठी आणि मानसिक स्वास्थ्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून अश्वपरीस फाऊंडेशन आपल्या समाजोपयोगी कार्यात एक नवा अध्याय सुरू केला.

आपण समाजाचे देणे लागतोया प्रेरणेतून अश्वपरीस फाऊंडेशन भविष्यात अधिक व्यापक आणि प्रभावी समाजोपयोगी उपक्रम राबवण्याचा दृढ संकल्प करत असल्याचे जाहीर केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती कर्मचारी, अधिकारी तसेच अश्वपरीस फाऊंडेशनचे पदाधिकारी इशिका शेलार, बनिता सहा, सुरेखा नायकर, दीपक वत्स, कार्तिक नायकर, परिसा शेलार यांनी परिश्रम घेतले.

# टोकार्डे केंद्रातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**तळा : प्रतिनिधी**

श्री क्षेत्रपाळ नवतरूण क्रीडा मंडळ टोकार्डेच्या माध्यमातून रविवारी (दि.२२) टोकार्डे येथे टोकार्डे केद्रातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

या वेळी माजी सरपंच विठ्ठल सुतार, केंद्रप्रमुख तथा विस्ताराधिकारी दिपक ठाकूर, गावचे अध्यक्ष राम शिर्के, महादेव खेरटकर, मंडळाचे अध्यक्ष वैभव सुर्वे, कार्याध्यक्ष संतोष मोरे, सेक्रेटरी मंगेश पवार, रविंद्र फडके, प्रमिला भौड आदी उपस्थित होते.

श्रीक्षेत्रपाळ नवतरुण क्रीडा मंडळाचा शैक्षणिक साहित्य वाटपाचा हा उपक्रम पहिलाच असून या मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वह्या, कंपासपेटी, चित्रकलावही, रंगपेटी इत्यादी शैक्षणिक साहित्याचा वाटप करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणात एक चांगले प्रोत्साहन मिळाले आहे. या मंडळाने अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यात शाळेला रंगरंगोटी करणे असे समाजहिताचे उपक्रम राबविले आहेत.

या वेळी केंद्रप्रमुख दिपक ठाकूर, माजी सरपंच विठ्ठल सुतार, रवींद्र फडके व संस्थेचे पदाधिकारी यांनी मार्गदर्शन केले की, मंडळांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्याने शिक्षणात प्रोत्साहन मिळेल. या त्यांच्या उपक्रमामुळे आपल्या ग्रामीण भागातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना लाभ झाला असून पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# महाडमध्ये अधिकाऱ्यांची बैठक, आपत्ती निवारण साहित्याचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

महाड व पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त गावातील पालक अधिकारी यांची नियुक्ती आणि पालक अधिकाऱ्यांची बैठक तसेच आपत्ती साहित्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी घेण्यात आलेल्या आढावा बैठकीला तहसीलदार महेश शितोळे, मुख्याधिकारी कोळेकर उपस्थित होते.

महाड प्रांताधिकारी पोपट ओमासे यांच्या मार्गदर्शनाखाली आज तालुक्यातील पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. या वेळी आढावा बैठक देखील घेण्यात आली. महाड नगर पालिकेच्या आवारात घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात तालुक्यातील आपदा मित्र आणि संस्थाना आपत्ती साहित्यांचे वाटप करण्यात आले.

साहित्य वाटप करताना त्याचे प्रत्यक्षदेखील प्रात्यक्षिक घेण्यात आले व त्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या तसेच महाड तालुक्यातील साळुंके रेस्क्यू टीम व सिस्केटीम यांनादेखील साहित्याच्या किट देण्यात आल्या.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे – मालडुंगे ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे मालडुंगे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) आकार |
|---|---|---|---|---|
| मालडुंगे | गौरांग महिंद्र नाईक<br>चिन्मय महिंद्र नाईक | ८२ | २/अ/३ | ०-२०-००<br>०-०५-५० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **२१ दिवसांच्या** आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०६/२०२५
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड. प्रधान मधुकर पाटील**
ऑफिस नं.१३५, पहिला मजला, नगर पालिका कॉम्पलेक्स, छत्रपती शिवाजी महाराजाचा पुतळ्याचा पुढे, पनवेल, जि. रायगड-४१०२०६,
मोबाईल. ९३२४३७५५०२

## निवडक

### तरुणीवर चाकूने हल्ला

**नवी मुंबई :** आपसातील जुन्या वादातून तरुणाने २२ वर्षीय तरुणीवर चाकूने वार केल्याची घटना तुर्भे नाका येथे घडली आहे. परिसरात राहणारी तरुणी गोवंडी परिसरातील तिच्या मित्रासोबत बुधवारी रात्री ११च्या सुमारास त्या ठिकाणी होती. या वेळी दोघांमध्ये जुन्या वादावर चर्चा सुरू असताना वाद अधिक वाढला. त्यामध्ये तरुणाने सोबत आणलेल्या चाकूने तिच्या छातीवर वार करून पळ काढला. पोलिसांना घटनेची माहिती मिळाली. तरुणीकडे केलेल्या चौकशीत जुन्या वादातून हा हल्ला घडल्याचे समोर आले. त्यावरून गोवंडी परिसरात राहणाऱ्या तरुणावर गुरुवारी तुर्भे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### परीक्षेचे सुधारित वेळापत्रक

**नवी मुंबई :** महानगरपालिका सरळसेवा पदभरती २०२५ च्या ऑनलाईन परीक्षेचे सुधारित वेळापत्रक जारी करण्यात आले असून ह्या परीक्षा दि. १६ जुलै, १७ जुलै, १८ जुलै व १९ जुलै २०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहेत, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन विभागाच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

### मस्करीवरून मित्राचा कापला गळा

**नवी मुंबई :** तुर्भे येथील तरुणाच्या हत्या प्रकरणात मस्करी जिवावर बेतल्याचे तपासात समोर आले आहे. मुलीवरून सतत चिडवत असल्याने मित्रानेच मित्राची हत्या केल्याचे उघडकीस आले. ही घटना बुधवारी घडली होती. संजय बेहरा (वय २२, रा. आजवानी कॉरी, महापे) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी सुरेश होनहागा (वय २०) याला अटक केली आहे. चौकशीत संजयकडून होणाऱ्या बदनामीमुळे त्याची हत्या केल्याची कबुली सुरेशने दिली.

### नेरूळ पूर्व भागात वृक्षारोपण

**नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर ३ येथील चाचा नेहरू उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी विविध देशी रोपांची लागवड करण्यात आली. त्या रोपांचे पुढील तीन वर्ष संगोपन करण्यात येणार आहे. माजी नगरसेवक सुरेश शेट्टी यांच्या जन्मदिनानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी माजी नगरसेविका शिल्पा कांबळी उपस्थित होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या झाडे लावा झाडे जगवा या आवाहनाला अनुसरून हे वृक्षारोपण करण्यात आले आहे. यापुढेदेखील देशी वृक्षांच्या लागवडीवर भर दिला जाईल, असे माजी नगरसेव सुरेश शेट्टी व माजी नगरसेविका शिल्पा कांबळी यांनी सांगितले.



# मलेरिया, डेंग्यू प्रतिबंध शिबिर

## ६७ हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळा कालावधी हा हिवताप व डेंग्यूसारखे रोग पसरविणाऱ्या डासांसाठी पोषक असून या डासांची उत्पत्ती मुख्यत्वे घरांतर्गत व घराभोवताली स्वच्छ साचलेल्या पाण्यामध्ये होत असते. याबाबत नागरिकांना माहिती देऊन त्यांना ही स्थाने नष्ट करण्याबाबत जागरूक करण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातीत विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात येत आहे.



महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली एप्रिल महिन्यापासून ही शिबीरे २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या परिसरात सातत्याने राबविण्यात येत असून १८२ शिबीरांचा लाभ ६७ हजार ४२९ नागरिकांनी घेतलेला आहे. या शिबीरांमध्ये चार हजार ६०७ रक्तनमुने तपासणीसाठी घेण्यात आलेले आहेत.

२६ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात शिबीरे आयोजित करण्यात आलेली असून त्याठिकाणी ११ हजार ०७४ नागरिकांनी भेट दिली आहे. तसेच ६६२ नागरिकांचे रक्तनमुन घेण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे डास प्रतिबंधासाठी महानगरपालिका व खाजगी शाळा आणि महाविद्यालये तसेच शासकीय अथवा निमशासकीय कार्यालये याठिकाणी प्रतिबंधात्मक पावडर फवारणी करण्यात येत असून आत्तापर्यंत २१४ शाळांमधील आठ हजार ५७९ वर्ग खोल्यांमध्ये फवारणी झालेली आहे. तसेच ८९ शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयांमधील दोन हजार ९३०खोल्यांमध्ये पावडर फवारणी करण्यात आलेली आहे.

घरातील व घराबाहेरील झाडांच्या कुंड्यांच्या खालील प्लेटमधील पाणी, झाकण नसलेली पाणी साठविण्याची भांडी आणि घरातील फेंगशुई अथवा शोभेच्या झाडांमध्ये साचलेले पाणी, गॅलेरीत अथवा गच्चीवरील व घराच्या परिसरात साचलेले भंगार साहित्य, रिकाम्या बाटल्या, करवंट्या, रंगाचे डबे तसेच झाकण नसलेले ड्रम व पाण्याच्या टाक्या याठिकाणी डास उत्पती होत असल्याने या जागी पाणी साचून राहणार नाही याची नागरिकांनी दक्षता घ्यायची आहे.

> **नमुंमपा आरोग्य विभागाच्या वतीने प्रतिबंधात्मक कार्यवाही सातत्याने करण्यात येत असून त्याला डास उत्पती होउ न देण्याबाबत नागरिकांचे जागरुक सहकार्य लाभले तर नवी मुंबईत मलेरिया, डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल. त्यामुळे नागरिकांनी याकामी संपूर्ण सहकार्य करावे.**
> **-डॉ. कैलास शिंदे,**
> आयुक्त, महापालिका

# नवी मुंबईत भाजपचे बुद्धिजीवी संमेलन



**नवी मुंबई : बातमीदार**

विकसित भारताचा अमृतकाळ, सेवा सुशासन आणि गरीब कल्याणाची ११ वर्ष यानिमित्त भाजपने मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या वतीने नवी मुंबई जिल्ह्यातील मान्यवर व्यक्ती (उदा. वकील, डॉक्टर, लेखापाल, उद्योजक, व्यावसायिक) यासोबतच सरकारच्या विविध योजनांचे लाभार्थी यांसोबत सभेदरम्यान चर्चासत्र कार्यक्रम शुक्रवारी सानपाडा सेक्टर ८ येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला आमदार संजय केळकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे, माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील, अनिल कौशिक, माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, आयोजक डॉ.राजेश पाटील, निलेश म्हात्रे, अभिजित पेडणेकर, माजी नगरसेवक संपत शेवाळे, डॉ.जयाजी नाथ, माजी नगरसेवक दीपक पवार, माजी नगरसेविका अंजली वाळुंज, माजी नगरसेविका सायली शिंदे, कृष्णा पाटील, दत्ता घंगाळे, राजेश राय उपस्थित होते.

या वेळी माध्यमांशी संवाद साधताना, आमदार संजय केळकर यांनी सांगितले की, विकसित भारतासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेली ११ वर्षे या देशात सुरक्षितता, विकास, सोयी सुविधा यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. या योजनांच्या माध्यमातूनच दारिद्र्य रेषेचं प्रमाण कमी करण्यात यश आले आहे. गरिबाच्या कल्याणाकरिता जिवाचे रान करणारे हे मोदी सरकार आहे. आर्थिकदृष्ट्या आपण चौथ्या क्रमांकावर आहोत. हे विकसित भारताचं उदाहरण आहे. लोकांनीही पाठिंबा, समर्थन दिले आहे. आज १८ कोटी लोकं भाजपचे सदस्य आहेत. विकसित भारताच्या यात्रेमध्ये अधिकाधिक लोक जोडले जातील. या यात्रेमध्ये सर्वांनी सहभागी व्हावं, असे आवाहन त्यांनी केले.

राजेश पाटील यांच्या रूपाने सहृदय, संवेदनशील, सक्षम असे अध्यक्ष या नवी मुंबईला लाभले आहेत. ते कामही त्याच प्रकारचं करतील, याची मला खात्री आहे, असेही ते म्हणाले. यावेळी भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, आवास योजनेंतर्गत गरिबांना घरं मिळाली, नळ योजना आल्या, रस्ते झाले, शौचालय झाले. सामान्य घटकाला केंद्रबिंदू मानून मोदी सरकारने ज्या गोष्टी केल्या. त्या गोष्टी सामान्य घटकाला पुढे नेण्यासाठी आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे. आज या कार्यक्रमाला सर्वच क्षेत्रातील, स्तरातील लोक उपस्थित होती. सर्वांना त्यांच्या त्यांच्या फायद्याच्या योजनांची माहिती देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

## ‘दिबां’च्या स्मृतीदिनी वाशीत विविध कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था यांच्या वतीने लोकनेते दि.बा. पाटील यांच्या पुण्यतिथी विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या अनुषंगाने ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान आणि त्यांना छत्र्या भेट तसेच इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

कार्यक्रम सिडको एक्सझीबिशन सेंटर ऑडिटोरियम, जोयालूक्कास ज्वेलर्स समोर, सेक्टर-३०, वाशी येथे २४ जून रोजी सायंकाळी ४ वाजता करण्यात येणार असून लोकनेते दि.बा. पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यकमास मोठया संख्येने दि बा समर्थकांनी उपस्थित रहावे, अशी विनंती संस्थेचे अध्यक्ष दशरथ भगत यांनी केली आहे.

## अनधिकृत शेडवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने जी विभाग ऐरोली अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उपायुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात अनधिकृत शेडवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील ऐरोली विभाग अंतर्गत ऐरोली येथील शिवार धाबा व साई कुटीर धाबा यांनी तात्पुरते शेड उभारण्यात आलेले होते. हे अनधिकृत शेड नमुंमपाच्या कारवाई अंतर्गत निष्कासित करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी एक जेसीबी व सात मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली येथील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यापुढेदेखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# उरण येथे संकल्प से सिद्धी कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

आपल्या देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजप सरकारची यशस्वी ११ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मोदी सरकार के ११ साल संकल्प से सिद्धी अभियानांतर्गत उरण मंडळाच्या वतीने उरण द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात रविवारी (दि.२२) संकल्प से सिद्धी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यशाळेला प्रमुख अतिथी कर्जत मंडळ अध्यक्ष, राजेश भगत उपस्थित होते. त्यांनी कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. जसखार ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दामूशेठ घरत यांना आदर्श सरपंच पुरस्कार मिळाल्याने त्यांचे कर्जत मंडळ अध्यक्ष राजेश भगत यांनी विशेष सत्कार करून अभिनंदन केले.

या वेळी उरण विधानसभा अध्यक्ष रवी भोईर, भाजप उरण शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, उरण तालुका भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष राणी म्हात्रे, रायगड जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, रायगड जिल्हा उपाध्यक्ष संगीता पाटील, जासई विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, उरण तालुका भाजप सरचिटणीस सुनील पाटील, जसखार ग्रामपंचायत माजी सरपंच दामुशेठ घरत, माजी जि.प.सदस्य जीवन पाटील, उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उरण नगर परिषद माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, माजी जि. प. सदस्य जीवन गावंड, उरण तालुका महिला मोर्च्या चिटणीस निशा म्हात्रे, धुतुम ग्रामपंचायत माजी सरपंच धनाजी घरत, मेघनाथ तांडेल आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोहोपाड्यात कापडी पिशव्यांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे (मोहोपाडा) ग्रुप ग्राम पंचायत हद्दीत बाजारपेठेतील दुकानदार, भाजीविक्रेते प्लास्टीक पिशव्यांचा वापर करत असच्याचे ग्रामपंचायत स्वच्छता कमिटीच्या लक्षात आले.यासाठी ग्रामपंचायतीच्यावतीने प्लास्टीक बंदीवर आवाहन करण्यात आले.



यासाठी ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी आणि स्वच्छता कमिटी सदस्यांकडून प्लास्टीक पिशवी बंदीसाठी वासांबे मोहोपाडा हद्दीत आठवडाभर प्लास्टीक पिशवी मुक्त फेरी अभियान सुरू असून दिवसाआड फेरी अभियान सुरू राहणार आहे. मोहोपाडा, नवीन पोसरी, रिस बाजारपेठातील प्लास्टीक पिशव्या वापरणाऱ्या दुकानदारांवर कारवाई सुरू असून ग्रामपंचायतीकडून दंड आकारला जात आहे.

यासाठी ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व स्वच्छता कमिटी सदस्यांकडून प्लास्टीक पिशवी बंदीसाठी मोहोपाडा बाजारपेठ मासळी बाजार, मोहोपाडा ते विजवितरण कार्यालय रस्त्यालगतची दुकाने, गणेशनगर रिस ते दांडफाटा परिसरात जनजागृती केली जात आहे.

दरम्यान, ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांच्यावतीने मोहोपाडा व इतर बाजारपेठेतील दुकानदार, भाजी विक्रेते, फळविक्रेते तसेच बाजारहाट करण्यासाठी आलेल्या नागरिकांना कापडी पिशव्या वाटप केल्या जात आहेत. शिवाय मोहोपाडा गावची ग्रामदेवता जत्रोत्सवात ग्रामस्थांना प्लास्टीक पिशव्यांचा वापर पर्यावरणास हानीकारक असल्याचे सांगून कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्लास्टीक पिशवी बंदीसाठी ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व स्वच्छता कमिटी सदस्य परिश्रम घेत आहेत.

## फुंडे येथील विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य साळुंखे बी. बी यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक पाटील डी. डी यांनी केले.

त्यानंतर सांस्कृतिक विभाग प्रमुख पाटील एच. एन यांनी योग दिनाचे महत्व विषद केले. योग मार्ग हा मानवी कल्याणाचा मार्ग आहे. शरीराच्या बाह्य आकारापेक्षा सुदृढतेला अधिक महत्व दिले पाहिजे तसेच मनाची एकाग्रता व तणावमुक्ती साठी योगाभ्यास महत्वाचा आहे. या वेळी ताडासन, वृक्षासन, हालासन, सर्वांगासन, नौकासन, शिर्षासन, सुखासन, पदमासन, शशांकासन, मकरासन, शवासन पवनमुक्तासन, पर्वतासन इत्यादी आसनांचे, प्रात्यक्षिक करून दाखविले व प्रत्येक आसनाचे आपल्या आरोग्या साठी काय महत्व आहे हे सांगितले.

या कार्यक्रमास विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य साळुंखे बी.बी. उपमुख्याध्यापिका थोरात एस.डी, पर्यवेक्षिका बाबर एस.एम, पाटील, एस.एस. तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमास सर्वांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



## सीवूड्समध्ये मंदिराच्या दानपेटीतून रोकड लंपास

**नवी मुंबई :** सीवूड्स, सेक्टर ४८मधील विठ्ठल-रखुमाई मंदिरात अज्ञात चोरट्याने दानपेटीवर डल्ला मारल्याची घटना घडली आहे. पहाटे चोरीचा प्रकार उघडकीस आला असून, चोरट्यांनी दानपेटी फोडून अंदाजे ३५ ते ४० हजारांची रोकड लंपास केली आहे. याप्रकरणी एनआरआय पोलिस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

## भाजप नेते राजेंद्र पाटील यांनी जाणून घेतल्या आशा सेविकांच्या समस्या



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील अजिवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा सेविकांनी पुकारलेल्या कामबंद आंदोलनाला भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील व गटविकास अधिकारी यांनी भेट देत आशा सेविकांच्या समस्या जाणून घेतल्या.

या वेळी भाजप नेते राजेंद्र पाटील यांनी आशा सेविकांचा प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्यासमोर मांडून तो सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनीही शासन स्तरावर आशा सेविकांचा प्रश्नाबाबत पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

या वेळी अजिवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. सायली मानकर, सुनील पाटील, अप्पा भागित, सूरज शिंगाडे आदी उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयात योगसाधना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्स्टिटट्यूट ऑफ योग अँड आयुर्वेद, (श्री धुतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचालित) व आरोग्य सेवा समिती पनवेल यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि.२१) जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून माजी महापौर चारुशीला घरत व सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण उपस्थित होते. आरोग्य सेवा समितीच्या सदस्या श्रीमती सुमेधा रिसबूड, गीता गुप्ता, दीपाली सकपाळ आणि स्वराली जोशी ह्यांनी विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारची योग आसने करून घेतली. मुख्याध्यापक चव्हाण यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी फिटनेससाठी नियमितपणे सूर्यनमस्कार व योगासनांचा अभ्यास करावा, असे आवर्जून सांगितले.

या शिबिरात एकूण ६२ विद्यार्थी सहभागी झाले. या शिबिरासाठी विद्यालयाचे शिक्षक, नितीन म्हात्रे, अशोक पाटील, स्नेहा पाटील आणि प्राची इसे या शिक्षकांचे सहकार्य लाभले.



# माथेरानची वाहतूक कोंडी कमी होणार

## दस्तुरी नाका वाहनतळाच्या जागेची पाहणी आणि आढावा बैठक

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान या निसर्गरम्य पर्यटनस्थळी पावसाचा आनंद घेण्यासाठी मुंबई-पुण्यातील पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. यामध्ये आपले वाहन घेऊन येणाऱ्या प्रवाशांची संख्याही वाढतच असल्याने वाहनतळात पार्किंगची समस्या निर्माण झाली आहे. अपुऱ्या वाहनतळामुळे घाट मार्गात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने पर्यटकांना होणारा त्रास याकडे लक्ष वेधत माथेरान वनव्यवस्थापन समिती आणि वन विभागाच्या पुढाकारातून वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याकरिता माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समिती, टॅक्सी चालक संघटना यांच्या उपस्थितीत उपाय योजनांसंदर्भात आढावा बैठक झाली. यामध्ये माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाका येथील वाहनतळाच्या जागेची पाहणी करून आढावा घेण्यात आला.



सध्या माथेरान येथे पावसाळी पर्यटन जोरात सुरू आहे. प्रत्येक विकेंडला पर्यटक मोठ्या संख्येने येथे दाखल होतात. या वेळी नेरळ-माथेरान घाट रस्त्यात होणारी वाहतूक कोंडी तसेच शहरातील माल वाहतुकीस होणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी नियोजन करताना या ठिकाणी कोणत्या उपाययोजना कराव्यात या संदर्भात वन विभाग अधिकारी उमेश जंगम, माथेरान वन व्यवस्थापन समिती अध्यक्ष योगेश जाधव, वनपाल राजकुमार आडे, माथेरान नगर परिषद कार्यालयीन अधीक्षक सदानंद इंगळे, लेखापाल भारत पाटील, माजी नगराध्यक्ष अजय सावंत, मनोज खेडकर, टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष प्रवीण पोलकम, अनिल सुर्वे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीचे चंद्रकांत जाधव, रत्नदीप प्रधान, सुनील शिंदे, माजी नगरसेवक शिवाजी शेलार, अश्वपाल संघटना अध्यक्ष आशा कदम आदी मंडळी उपस्थित होती.

या बैठकीत येथील गव्हर्नर हिलकडे जाणारी रस्त्यावरील दुचाकी पार्किंग ही पॅनोरोमा पॉईंटकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या जागेत करण्यात येणार असल्याचे ठरले तसेच येथील स्थानिकांच्या दुचाकी एमटीडीसी रिसॉर्टच्या मागील रिकामी जागेत लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे गव्हर्नर हिलकडे जाणारा रस्ता मोकळा करून त्याजागेमध्ये चारचाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था केली जाणार आहे. शंभर गाड्या तरी या ठिकाणी उभ्या राहू शकतात असे या वेळी सांगण्यात आले. ही जागा सुस्थितीत करण्यासाठी माथेरानमधील नागरिक, टॅक्सी संघटनेचे सदस्य यांच्या संयुक्त विद्यमाने २४ जून रोजी श्रमदान करण्यात येणार असल्याचेदेखील सांगण्यात आले आहे.

# छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावनभूमीत जन्म हे आपणा सर्वांचे भाग्य –लक्ष्मण उतेकर

## नरवीर पुरस्कार, विद्यार्थी गुणगौरव, हेल्मेट वाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

जगाने ज्यांच्या युद्धनितीचा आणि गनिमीकाव्याचा अभ्यास सुरू केला, ज्यांचे थोड्या-थोडक्या वर्षांमध्ये हिंदवी स्वराज्य साकारण्याचे यशस्वी प्रयत्न अभ्यासले. औरंगजेबासारख्या पातशहासमोरची खिल्लत लाथेने उडवत दिल्लीच्या तख्तावरून महाराष्ट्रात थडगे बांधण्यासाठी जणू निमंत्रण दिले त्या छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावनभूमीत आपण जन्मलो हे आपणा सर्वांचे भाग्य आहे, असे उद्गार 'छावा' चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी काढले.

'आपली माती आपली माणसं'तर्फे नरवीर पुरस्कार वितरण, सर्व माध्यमिक शाळांच्या दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अन् हेल्मेट वाटपाचा तसेच शेतकऱ्यांना रोप वाटपाचा कार्यक्रम पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणामध्ये करण्यात आला. त्या वेळी दिग्दर्शक उतेकर बोलत होते.

व्यासपीठावर माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, उद्योजक रामदास कळंबे, रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन हनुमंत जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजय सलागरे, माजी सभापती दिलीप भागवत, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, भाजप अध्यक्ष वैभव चांदे, कापडे सरपंच आदिती मोरे, तहसीलदार कपिल घोरपडे, सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, महावितरणचे अभियंता चोरमले, गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, सहसंपर्कप्रमुख किशोर जाधव, ज्ञानोबा केसरकर, माजी सभापती शैलेश सलागरे, उद्यानपंडित रामचंद्र कदम, सिनेअभिनेते हरिओम घाडगे, 'आपली माती आपली माणसं'चे संस्थापक राज पार्टे, अध्यक्ष निलेश कोळसकर, सेक्रेटरी संजय उतेकर, कृउबा समितीचे संचालक लक्ष्मण मोरे आदी उपस्थित होते.

या वेळी माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, आपणा सर्वांना दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांची या मातीशी बांधिलकी त्यांच्याच शब्दात ऐकण्याची संधी मिळाली. चित्रपट अनेक निघतात, पण 'छावा'सारखाच एखादाच जगाचे लक्ष वेधून घेतो. त्यामागे लक्ष्मण उतेकरांसाठी तळमळ व परिश्रम असावे लागतात, असे सांगून पोलादपूरच्या खऱ्या वारसदारांचा सत्कार करणाऱ्या 'आपली माती आपली माणसं'चे संस्थापक राज पार्टे यांच्या गेल्या आठ वर्षांपासूनच्या प्रयत्नांना सर्वपक्षीय सर्वसमावेशक असे व्यासपिठ प्राप्त झाले. या ठिकाणी समाज, प्रशासन आणि राजकीय व पत्रकार क्षेत्रातील सर्वांचीच भरगच्च उपस्थिती या संघटनेला सर्वस्तरातून मिळणारा प्रतिसाद किती आपुलकीतून आहे याचे द्योतक असल्याचे सांगितले.

कापडे येथील वरदायिनी माध्यमिक विद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत आधारकार्ड, ॲग्रोस्टॅक, पीएम किसान, जीवंत सातबारा मोहिम, शिधापत्रिका, संजय गांधी व इंदिरा गांधी योजना, नैसर्गिक आपत्तीशेती नुकसान, नवीन मतदान नोंदणी विविध दाखले वाटपाचे आयोजन करण्यात आल्याचे तहसीलदार कपिल घोरपडे यांनी सांगितले. उद्योजक रामदास कळंबे यांनी येत्या पाच वर्षांमध्ये १०० तरूणांना रोजगार देण्याचे उद्दीष्ट असल्याचे सांगून तालुक्यात रोजगार निर्मिती करून शहरातील लोकसंख्या पुन्हा गावाकडे येईल, असे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

या वेळी शारिरीक शिक्षक संघटनेचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष किसन सुरवसे, संस्थापक राज पार्टे, राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, अमर कदम हा ड्रॅगन्स फ्रुटसची शेती करणारा तरुण, तीर्थयात्रा घडविणारे लक्ष्मण खेडेकर, वैद्यकीय मदत कक्ष समाजसेवक कृष्णा कदम, गोरक्षक दीपक बाबाजी उतेकर, सिंधुदूर्ग मुख्याधिकारी स्वप्नील कदम, बडोदातील उद्योजक कल्पेश साने व विश्वनाथ पार्टे, सुशिक्षित शेतकरी विजय रिंगे, समाजसेवक योगेश रिंगे, तानाजी रिंगे व रामशेठ साळवी, डॉ. गुलाबराव सोनवणे, पत्रकार संघाचे कोकण अध्यक्ष शैलेश पालकर, युट्यूब संपादक मिलिंद खारपाटील, रामदास कळंबे, सुनील चव्हाण तसेच अन्य मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. याचबरोबर दहावीतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांच्या विद्यार्थ्यांचा सत्कार, ४५ समाजसेवकांचा सत्कार आणि १०० मोटरसायकलस्वारांना हेल्मेट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी पार्टे व सहकाऱ्यांनी केले.



# खांदाड स्मशानभूमी मोजतेय अखेरची घटका!

## निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे पूरात वाहून जाण्याची भीती

**माणगाव : बातमीदार**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावातील काळ नदीकिनारी नुकतेच नव्याने बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने स्मशानभूमी अखेरची घटका मोजत आहे. काळ नदीला महापूर आल्यास काही महिन्यांपूर्वी बांधलेली स्मशानभूमी उद्घाटनापूर्वीच जमीनदोस्त होऊन पूरात वाहून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे खांदाड गावातील ग्रामस्थांनी तीव्र भावना आणि संताप व्यक्त केला आहे.

खांदाड गावात सोनभैरव मंदिराजवळ जूनी स्मशानभूमी मजबूत स्थितीत आहे. या स्मशानभूमीजवळच सहा महिन्यांपूर्वी नवीन स्मशानभूमी बांधण्यात आली आहे. याच परिसरात पाण्याची टाकी आणि जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात येत आहे, मात्र नवीन स्मशानभूमीला चारही बाजूंनी तडे गेले आहेत. नुकत्याच आलेल्या पुरात संपूर्ण बांधकाम डळमळीत झाले आहे.



पाया दणकट आणि खोल न खोदल्याने ढासळण्याच्या अवस्थेत आहे. संपूर्ण स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे. हे बांधकाम कधीही ढासळू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

या स्मशानभूमीचे बांधकाम पडू नये आणि ते कोसळून नदीच्या पुरात वाहून जाऊ नये यासाठी ठेकेदाराने बुडत्याला पाईपचा आधार दिला आहे. हा टेकूचा तात्पुरता आधार दिला आहे. ही नवीन स्मशानभूमी बांधण्यासाठी खांदाड गावातील ग्रामस्थांनी जमीन दिली आहे, मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने शासनाचे लाखो रुपये खर्च केलेले पाण्यात जाणार आहेत. माणगाव नगरपंचायतीने हे बांधकाम ठेकेदाराकडून नव्याने करुन घ्यावे तसेच या ठेकेदाराला पून्हा कोणत्याही प्रकारचा ठेका देण्यात येऊ नये, अशी मागणी खांदाड गावातील ग्रामस्थांनी केली आहे.

# नेरळमध्ये योग दिन उत्साहात साजरा

**नेरळ : प्रतिनिधी**

राष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत नेरळ येथील आगरी समाज हॉल येथे पूर्वसंध्येला कार्यक्रम झाला. या वेळी योग शिक्षिका नलिनी मंगेश कराळे यांनी महत्त्व पटवून दिले.

योगासनांचा दैनंदिन जीवनात समावेश केल्यास शरीराला अनेक आजारांपासून दूर ठेवण्यास फायदा, तर अगदी तणाव कमी करण्यापासून ते रक्ताभिसरण सुधारण्यापर्यंत विविध गोष्टींसाठी लाभ होतो.

५० दिवस सुरू असलेल्या योग दिनात चंद्रकांत पाटील, मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. यासाठी आरोग्य योग आणि नॅचरोपॅथी इन्स्टिट्यूट चे संस्थापक डॉ. विजय कूकरेजा मार्गदर्शन करीत आहेत. कार्यक्रमाला सहयोगशिक्षिका निलम शहा, मनिषा डायरे उपस्थित होते.

# श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन कॉलेजमध्ये जागतिक योग दिन



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व रुग्णालय, वेलशेत येथे कॉलेजच्या प्राचार्य डॉ. ज्योती जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ११वा जागतिक योग दिनी योगासने व प्राणायम करून साजरा करण्यात आला.

श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजमध्ये जागतिक योग दिनाचे औचित्य साधून १६ ते २१ जूनदरम्यान योग सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले.

या सप्ताहाची सुरुवात योग वर्कशॉपने झाली. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी एक पृथ्वी, एक स्वास्थासाठी योग या धरतीवर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्राचार्य डॉ. ज्योती जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. योग सप्ताहामध्ये योगा चॅलेंज, ग्रुप स्लोगन कॉम्पिटिशन त्याचबरोबर सामान्य लोकांमध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी योग अवेअरनेस रॅली काढण्यात आली. २० जून शुक्रवार रोजी योग सरावाचे सत्र पार पडले. शनिवार सकाळी योग संगम हा कार्यक्रम पार पडला. यामध्ये कॉलेजच्या प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, रुग्णालयीन कर्मचारी, विद्यार्थी आणि रुग्ण यांचा सहभाग होता.

कार्यक्रमाची सुरुवात योग गीताने करून आयुष विभागाच्या सामान्य योग अभ्यासक्रमानुसार वेगवेगळी आसने करण्यात आली. या कार्यक्रमास नागोठणे पोलीस ठाण्याचे हवालदार महेश लांगी व बळी पुट्टेवाड यांची उपस्थिती लाभली. योग अभ्यासानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला. योग चॅलेंज या स्पर्धेत प्रेरणा देवरूखकर हिने प्रथम व शंतनु पवार याने द्वितीय क्रमांक पटकावला. ग्रुप स्लोगन कॉम्पिटिशन स्पर्धेतर्गत दोन विजेते गट काढण्यात आले. प्रथम क्रमांक आलेल्या गटामध्ये प्रेरणा शेडगे, श्रावणी शेलार, तन्वी विशे, वैष्णवी हेंद्रे व जितेंद्र उपाध्याय यांचा सहभाग होता. द्वितीय क्रमांक शिवांजली मोहिते, ऋतुजा झांबरे, संध्या डोले व प्रगती पाटील यांना देण्यात आला.

योग सप्ताह संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन, विश्वस्त कार्तिक जैन, राजिस्ट्रार वैभव नांदगावकर, प्राचार्य डॉ. ज्योती जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या सप्ताहात अर्चिस पाटील, सुचित्रा कुलकर्णी, नम्रता वेंगुर्लेकर, ज्योती जंगले, क्रांती मेटकर यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अस्मिता नाईक, प्रियंका इंगोले, प्राजक्ता गणोरकर, रवींद्र वावरे यांनी विशेष मेहनत घेतली.

# तळेगाव-गोरेगाव रा.जि.प. शाळेमध्ये प्रवेशोत्सव; प्रांताधिकाऱ्यांकडून नवागतांचे हृद्य स्वागत



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील पीएमश्री रा.जि.प. शाळा तळेगाव-गोरेगाव येथे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवेशोत्सव झाला. या कार्यक्रमासाठी माणगावचे प्रांत तथा उपविभागीय अधिकारी संदीपान सानप उपस्थित होते.

अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागतांचे स्वागत करण्यासाठी प्रवेशदिंडी, औक्षण पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश, शूज व पायमोजे वाटप तसेच विविध शैक्षणिक वस्तूंचे वाटप इ. उपक्रमांचे आयोजन केले होते. प्रांतधिकारी यांनी शाळा दत्तक घेतली असून भविष्यात शाळेसाठी सरकारमार्फत लागणाऱ्या सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक सर्व बाबी पूर्ततेसाठी मदतीचा हात देणार असल्याचेही सांगितले.

शाळेच्या प्रचंड विकासामागे मोलाचा वाटा असणाऱ्या मुख्याध्यापिका भांडविलकर, सहकारी शिक्षक श्री. सुपेकर, यांच्यासह कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेंद्र वाघमारे, उपाध्यक्ष अंजली बोडिलकर केंद्र प्रमुख श्री. मालोरे, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, रायगडभूषण पुरस्कृत डॉ. अजय मोरे, गावचे ग्रामस्थ व शिक्षण प्रेमी राजेश वाघमारे, वैभव मोरे, विजय वाघमारे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# दहावी, बारावीच्या परीक्षा केंद्र परिसरात संचारबंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात जून-जुलै २०२५मध्ये होणाऱ्या माध्यमिक (दहावी) व उच्च माध्यमिक (बारावी) परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने कडक आदेश लागू केले आहेत. परीक्षेच्या गोपनीयतेचे आणि सुरळीततेचे पालन करण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३च्या कलम १६३ अन्वये संचारबंदीचे आदेश निर्गमित केले आहेत.

२४ जून ते १६ जुलै या कालावधीत बारावी परीक्षेचे आणि २४ जून ते ८ जुलै या कालावधीत दहावी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षांच्या कालावधीत प्रत्येक परीक्षा केंद्राच्या ५० मीटर परिसरात संचारबंदी लागू राहणार आहे.

प्रत्येक पेपरच्या एक तास अगोदर ते पेपर संपल्यानंतर एक तासापर्यंत केंद्राच्या ५० मीटर परिसरात सामान्य नागरिकांना प्रवेशबंदी (विद्यार्थी, परीक्षा कर्मचारी वगळून) राहील. झेरॉक्स, एसटीडी बूथ, फॅक्स मशिन्स प्रत्येक पेपरच्या २४ तास आधीपासून बंद ठेवावे. मोबाईल फोन, पेजर, व आक्षेपार्ह साहित्य वापरण्यास सक्त मनाई राहील.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता, २०२३च्या कलम २२३ अंतर्गत कारवाई करण्यात येईल. परीक्षेच्या पारदर्शकतेस कोणताही धोका निर्माण होऊ नये म्हणून हे आदेश अत्यावश्यक असून संबंधितांनी त्याचे पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# खोपोलीचे ॲड. प्रल्हाद बट्टेवार यांना अण्णाभाऊ साठे पुरस्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली सुभाष नगर येथील रहिवासी अखिल मातंग संघ व भारतीय बहुजन आघाडीचे कोकण प्रदेश अध्यक्ष ॲड. प्रल्हाद बटेवार यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन शासनाने साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार नुकताच प्रदन करण्यात आला.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या समारंभाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रोहयोमंत्री भरत गोगावले, समाजकल्याण मंत्री संजय शिरसाठ, मातंग समाजाच्या राष्ट्रीय अध्यक्ष कुसुम गोपले व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



प्रल्हाद बटेवर हे एमए (इतिहास) एमए (राज्यशास्त्र) एलएलएम (मानवी हक्क) डी एल एल अँड डब्ल्यू पी जी डी इन (डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार) मुंबई विद्यापीठ शिक्षण झाले आहे. त्यांनी कामगार क्षेत्रातही भरीव काम केले आहे. शासनाने त्यांना पुरस्कार घोषित करताच खोपोलीत अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# टी-२० वर्ल्डकपसाठी कॅनडा संघ पात्र

## बहामास संघाचा उडवला धुव्वा

**किंग सिटी : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी संघांची निवड प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी होणार असून कॅनडा संघाने नुकतेच आपले स्थान निश्चित केले आहे.

अमेरिकन पात्रता फेरीत बहामास संघाचा सात गडी राखून पराभव करत कॅनडाने विश्वचषकाचे तिकीट मिळवले आहे. विशेष म्हणजे, कॅनडाने टी-२० विश्वचषक २०२४मध्येही सहभाग घेतला होता.



टी-२० विश्वचषक २०२६साठी कॅनडाच्या समावेशानंतर आतापर्यंत एकूण १३ संघांनी आपली जागा पक्की केली आहे. यजमान म्हणून भारत आणि श्रीलंकेच्या संघांना थेट प्रवेश मिळाला आहे, तर आयर्लंड, न्यूझीलंड आणि पाकिस्तान या संघांनी आयसीसी क्रमवारीच्या आधारे आपले स्थान मिळवले आहे. याव्यतिरिक्त, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आणि वेस्ट इंडिज हे संघ आधीच पात्र ठरले आहेत.

पात्रता फेरीतील सामन्यात बहामासचा संघ कॅनडासमोर फारसा प्रभाव पाडू शकला नाही. बहामासचा संघ केवळ ५७ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात कॅनडाने हे लक्ष्य सहज गाठले. दिलप्रीत बाजवाच्या नाबाद ३६ धावांच्या खेळीमुळे कॅनडाने केवळ ५.३ षटकांतच विजय नोंदवला.

तत्पूर्वी, कॅनडाचे फिरकी गोलंदाज कलीम सना आणि शिवम शर्मा यांनी प्रत्येकी तीन बळी घेत बहामासच्या संघाला अल्प धावसंख्येवर रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

### सात जागांसाठी चुरस कायम

आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेतील उर्वरित सात जागांसाठी अद्याप चुरस बाकी आहे. युरोपीय पात्रता फेरीतून दोन संघ (५ ते ११ जुलै), आफ्रिकन पात्रता फेरीतून दोन संघ (१९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर) आणि आशियाई ईएपी पात्रता फेरीतून तीन संघ (१ ते १७ ऑक्टोबर) मुख्य स्पर्धेत दाखल होतील.

# जो रूटला दहाव्यांदा बाद करत बुमराहचा विक्रम



**लीड्स : वृत्तसंस्था**

भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूट यांच्यातील चुरशीची लढत पुन्हा एकदा रंगली. लीड्स कसोटीत दुसऱ्या दिवशी बुमराहने रूटला बाद करत इंग्लंडला मोठा धक्का दिला. रूटने पहिल्या डावात ५८ चेंडूत २८ धावा केल्या, पण बुमराहच्या अचूक गोलंदाजीसमोर तो टिकू शकला नाही.

भारताचा पहिला डाव ४७१ धावांवर आटोपला. भारताने चांगली सुरुवात करत जॅक क्रावलीला स्वस्तात बाद केले, तो चार धावा करून तंबूत परतला. यानंतर ओली पोप आणि बेनडकेट यांनी दुसऱ्या विकेटसाठी १२२ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. बुमराहने डकेटला ६२ धावांवर त्रिफळाचीत केले. अखेरीस, बुमराहने जो रूटचीही विकेट घेतली. बुमराहच्या चेंडूवर रूट स्लिपमध्ये करुण नायरकडे झेल देऊन बसला. रूट भारतासाठी मोठा धोका ठरू शकला असता, पण त्याआधीच बुमराहने त्याला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

यासह बुमराह कसोटी क्रिकेटमध्ये रूटला सर्वाधिक वेळा बाद करणारा संयुक्तपणे दुसरा गोलंदाज ठरला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये २५ डावांमध्ये बुमराहने रूटला १० वेळा बाद केले आहे, तर ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडनेही ३१ डावांमध्ये रूटला इतक्याच वेळा बाद केले आहे. कसोटीत रूटला सर्वाधिक वेळा बाद करण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सच्या नावावर आहे, त्याने ३१ डावांमध्ये ११ वेळा पॅव्हेलियनचा रस्ता दाखवलाय.

बुमराह आणि रूट यांच्यात कसोटी क्रिकेटमध्ये नेहमीच एक रंजक लढत पहायला मिळते. दोघांमध्ये कसोटी क्रिकेटमधील स्पर्धा तीव्र असते, पण अनेकदा बुमराह रूटला बाद करण्यात यशस्वी ठरला आहे. कसोटीतील दोघांच्या आमना-सामन्याबद्दल बोलायचे झाल्यास २५ डावांमध्ये बुमराहने रूटला ५७० चेंडू टाकले आहेत, ज्यात रूटने २९च्या सरासरीने २९० धावा केल्या आहेत, तर तो १० वेळा बाद झाला आहे.

### वसीम अक्रमचा विक्रमही मोडला

इंग्लंडविरुद्धच्या हेडिंग्ले कसोटी सामन्यात पाकिस्तानचा स्विंग अन् यॉर्कर किंग वसीम अक्रमला मागे टाकत जसप्रीत बुमराह आता 'सेना' देशांत म्हणजे दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियामध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा आशियाई गोलंदाज ठरला आहे. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात दुसरी विकेट घेताच बुमराहच्या खात्यात १४७* विकेट्स जमा झाल्या. या यादीत अक्रम १४६ विकेट्ससह दुसऱ्या, तर भारताचा दिग्गज फिरकीपटू अनिल कुंबळे १४१ विकेट्ससह तिसऱ्या स्थानावर आहे.

# जो रूटने मोडला सचिनचा विक्रम; जयसूर्यालाही टाकले मागे

**लंडन : वृत्तसंस्था**

लीड्स येथील हेडिंग्लेच्या मैदानात इंग्लंडच्या जो रूट २८ धावांवर जसप्रीत बुमराहचा शिकार झाला, पण विकेट गमावण्याआधी त्याने खास विक्रमाला गवसणी घातली.

भारत-इंग्लंड यांच्यातील द्विपक्षीय मालिकेत इंग्लंडच्या मैदानात सर्वाधिक धावा करण्याचा सचिन तेंडुलकरचा रेकॉर्ड मोडीत काढत रूट या यादीत आघाडीवर पोहचला आहे. सचिनपेक्षा एक कसोटी सामना कमी खेळत त्याने भारत-इंग्लंड द्विपक्षीय कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम नावे केलाय.

घरच्या मैदानात भारतीय संघाविरुद्ध खेळताना रूटने आतापर्यंत १६ कसोटी सामन्यात १६०२ धावा केल्या आहेत. इंग्लंडच्या मैदानात यजमान संघाविरुद्धच्या १७ कसोटी सामन्यात सचिन तेंडुलकरने १५७५ धावा केल्या आहेत. रूट आणि तेंडुलकर पाठोपाठ या यादीत राहुल द्रविड १३७६ धावांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

ॲलिस्टर कुक घरच्या मैदानात खेळताना भारतीय संघाविरुद्ध ११९६ धावांसह चौथ्या क्रमांकावर असून त्यापाठोपाठ सुनील गावसकर यांनी इंग्लंडच्या मैदानात यजमान संघाविरुद्ध केलेल्या ११५२ धावांसह या यादीत पाचव्या क्रमांकावर आहेत.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत जो रूटने सनथ जयसूर्याला मागे टाकत नवव्या स्थानावर झेप घेतली आहे. रूटच्या खात्यात आता २१,०३३ धावा आहेत.

# वर्ल्डकप संघातून वगळल्यानंतर लक्ष्मण माझ्याशी तीन महिने बोलला नव्हता!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा माजी क्रिकेटपटू व्ही.व्ही.एस. लक्ष्मण याची आंतरराष्ट्रीय कसोटी कारकीर्द यशस्वी कारकीर्दींपैकी एक होती. तरीही या महान फलंदाजाला कधीही एकदिवसीय विश्वचषकात खेळण्याची संधी मिळाली नाही. त्याला २००३च्या आयसीसी विश्वचषक स्पर्धेसाठी संघातून वगळण्यात आले होते. त्याच्या जागी दिनेश मोंगियाची निवड करण्यात आली होती. या निर्णयामुळे तत्कालीन कर्णधार सौरव गांगुली आणि लक्ष्मण यांच्यात अबोला निर्माण झाला होता. याबाबतचा खुलासा खुद्द गांगुलीने केला आहे.

विश्वचषक स्पर्धेसाठी लक्ष्मण आणि मोंगिया यांच्यापैकी एकाचीच निवड होणार होती. लक्ष्मणची एकदिवसीय क्रिकेटमधील आकडेवारी फारशी प्रभावी नव्हती. त्याने केवळ २७.५५च्या सरासरीने १२४० धावा केल्या होत्या. त्यामुळे मोंगियाने त्याच्या क्षेत्ररक्षण कौशल्यामुळे संघात स्थान मिळवले.

### गांगुलीचा खुलासा

पीटीआयशी बोलताना सौरव गांगुलीने याबाबत भाष्य केले. तो म्हणाला, असे अनेक वेळा घडले आहे की, जेव्हा आम्ही खेळाडूंना विश्रांती द्यायचो, तेव्हा ते नाराज व्हायचे. लक्ष्मणला विश्वचषकातून वगळण्यात आले होते. त्यानंतर तीन महिने तो माझ्याशी बोलला नव्हता. नंतर मी त्याच्याशी समेट केला. विश्वचषक संघातून वगळल्यानंतर कोणताही खेळाडू नाराज होणे स्वाभाविक आहे. जेव्हा विशेषतः लक्ष्मणसारखा दर्जेदार खेळाडू असतो तो नाराज होणे स्वाभाविक आहे, मात्र विश्वचषक स्पर्धेत आम्ही चांगली कामगिरी केल्यानंतर तो आनंदी होता.

गांगुली पुढे म्हणाला, विश्वचषक स्पर्धेनंतर लक्ष्मणने एकदिवसीय संघात पुनरागमन केले. त्याने पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलियामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. आम्ही पहिल्यांदाच पाकिस्तानमध्ये जिंकलो आणि व्हीव्हीएसने त्यामध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावली होती.





खालापूर : उरण विधानसभा मतदारसंघातील वडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच गौरी महादेव गडगे, उपसरपंच महादेव कमळाकर गडगे आणि शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाळाराम शिर्के यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व शेकापमधील अनेक कार्यकर्त्यांनी नढाळ येथील पंचयतन मंदिरात आयोजित कार्यक्रमात भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत केले. सोबत पदाधिकारी.





# गावसकरांकडून पंतच्या शतकी खेळीचे कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडच्या हेडिंग्लेच्या मैदानात रंगलेल्या पहिल्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवशी भारताचा उपकर्णधार ऋषभ पंतच्या भात्यातून शतकी खेळी पाहायला मिळाली. या खेळीसह तो भारतीय संघाकडून कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकवणारा विकेट किपर बॅटर ठरला. त्याच्या या क्लास खेळीवर भारताचे माजी कर्णधार आणि सध्याच्या घडीला समालोचन कक्षात दिसणाऱ्या लिटल मास्टर सुनील गावसकर यांची कमेंट चर्चेचा विषय ठरत आहे.

लीड्स येथील हेडिंग्लेच्या मैदानात ऋषभ पंतने शतक साजरे केल्यावर कोलांटी उडी मारत शतकी खेळीचा आनंद व्यक्त केला. यावेळी कॉमेंट्री बॉक्समध्ये हर्षा भोगले यांनी पंतचे कौतुक करताना आपल्या शेजारी बसलेल्या गावसकरांना त्याच्या खेळीबद्दल काय वाटतं? असा प्रश्न विचारला. यावर गावसकरांनी सुपर्ब... सुपर्ब... सुपर्ब! अशा शब्दांत भारतीय विकेट किपर बॅटरच्या खेळीचं कौतुक केले. त्यांची ही प्रतिक्रिया ऐकल्यावर अनेकांना ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील त्यांचे कटू बोलही आठवले.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर सुनील गावसकर यांनी ऋषभ पंतच्या शॉट सिलेक्शनवर प्रश्नचिन्ह उपस्थितीत करताना स्टुपिड स्ट्युपिड स्टुपिड असे म्हणत पंतला चांगलेच झाडले होते.

### माजी क्रिकेटपटू डेव्हिड लॉरेन्स यांचे निधन

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना लीड्सच्या हेडिंग्ले मैदानावर सुरू असतानाच क्रिकेट विश्वासाठी एक अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. इंग्लंडचे माजी वेगवान गोलंदाज डेव्हिड लॉरेन्स यांचे वयाच्या ६१व्या वर्षी निधन झाले आहे. ते गेल्या वर्षभरापासून मोटर न्यूरॉन डिसऑर्डर या दुर्धर आजाराशी झुंज देत होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com